मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७० ■ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# २०२७ ची जनगणना डिजिटल असणार; सर्व कामं मोबाईल फोनद्वारे केली जाणार

**नवी दिल्ली :** जनगणना 2027 पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. याचे केंद्रबिंदू जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) नावाचे एक डिजिटल पोर्टल असेल. भारताचे रजिस्ट्रार जनरल (RGI) यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना माहिती दिली आहे की, जनगणना 2027 च्या हालचालींचा प्रत्यक्ष वेळेवर मागोवा घेण्यासाठी जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) तयार करण्यात आलीय. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या परिपत्रकात भारताचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांनी सांगितले की, येत्या जनगणना 2027 मध्ये डेटा संकलन आणि प्रसाराची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि वेळेवर सुधारणा करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाणार आहे.

डेटा डिजिटल पद्धतीने गोळा केला जाणार : त्यांनी पुढे सांगितले की, आगामी जनगणनेत, डेटा डिजिटल पद्धतीने गोळा केला जाणार आहे, जो जनगणना प्रक्रियेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक प्रमुख आणि परिवर्तनकारी पाऊल असेल. डेटा संकलनासाठी किमान 3.2 दशलक्ष फील्ड कामगार तैनात केले जातील. डिजिटल स्वरूप पारंपारिक कागद-आधारित पद्धतींची जागा घेणार आहे, ज्यामध्ये संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थापित करण्यासाठी हाताने चालणारी उपकरणे, जिओ-टॅगिंग आणि केंद्रीकृत वेब प्लॅटफॉर्मचा वापर केला जाणार आहे. सीएमएमएस प्रणालीमध्ये एक वेब-आधारित मॅपिंग ॲप्लिकेशन समाविष्ट आहे, जे घरांची यादी ब्लॉक्स (एचएलबी) आणि एन्युमरेशन ब्लॉक्स (ईबी) चे अचूक जिओ-टॅगिंग करण्यास अनुमती देते, ज्यामुळे डेटा ओव्हरलॅप आणि वगळणे कमी होते.

दुर्गम भागात सप्टेंबर 2026 मध्ये जनगणना केली जाणार : जनगणनेच्या कामकाजाशी परिचित असलेल्या सूत्रांनी ईटीव्ही भारतला सांगितले की, अचूक डेटा संकलनासाठी सीएमएमएस पोर्टलवर 600,000 हून अधिक एकात्मिक भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) नकाशे (जिल्हा/उप-जिल्हा/गाव पातळी) आधीच अपलोड केले गेलेत. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी यापूर्वी संसदेत सांगितले होते की, 2027 ची जनगणना डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. त्यांनी सांगितले की,



डेटा संकलन मोबाइल ॲपद्वारे केले जाणार आहे आणि स्व-मोजणीसाठी ऑनलाइन व्यवस्था देखील असेल. संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षण वेब पोर्टलद्वारे केले जाणार आहे. 2027 ची जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे, पहिल्या टप्प्यात राज्य आणि केंद्रशासित प्रदेश सरकारांच्या सोयीनुसार एप्रिल ते सप्टेंबर 2026 या 30 दिवसांच्या कालावधीत घरांची यादी आणि गृहसंख्या गणना यांचा समावेश असेल. त्यानंतर दुसरा टप्पा लोकसंख्या गणना (PE) असेल. एका अधिकाऱ्याने सांगितले की, ही जनगणना फेब्रुवारी 2027 मध्ये केली जाणार आहे. तसेच ही जनगणना लडाख आणि जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशांमध्ये तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या बर्फाच्छादित, दुर्गम भागात सप्टेंबर 2026 मध्ये केली जाणार आहे.

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सहकार्य करण्याचे आवाहन : राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, राज्य जनगणना नोडल अधिकारी, गृह मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि जनगणना संचालन संचालकांच्या अलिकडेच झालेल्या बैठकीत गृहसचिव गोविंद मोहन यांनी जनगणनेशी संबंधित उपक्रमांचे नियमितपणे निरीक्षण आणि पुनरावलोकन करण्यासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून सहकार्य मागितले. गृह सचिवांनी भारतातील जनगणना कार्याच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेवर आणि जनगणना 2027 च्या यशस्वी अंमलबजावणीत राज्य आणि केंद्रशासित प्रदेश सरकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला. त्यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना जनगणना अधिकाऱ्यांची वेळेवर नियुक्ती आणि प्रशिक्षण सुनिश्चित करण्याचे, अधिसूचना पुन्हा प्रकाशित करण्याचे, 31 मार्च 2027 पर्यंत कोणतेही अधिकारक्षेत्र बदल टाळण्याचे, स्व-गणनेसह डिजिटल साधनांचा प्रभावीपणे वापर करण्याचे आणि जनगणना 2027 ची पूर्ण उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जनजागृती, विश्वास आणि सहभाग वाढविण्यासाठी समर्पित प्रसिद्धी आणि संप्रेषण धोरण स्वीकारण्याचे आवाहन केले.

जनगणना कामासाठी तांत्रिक मनुष्यबळ : मंत्रिमंडळाच्या निवेदनात म्हटले आहे की, 2027 ची जनगणना यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विविध कामे पूर्ण करण्यासाठी सुमारे 18,600 तांत्रिक मनुष्यबळ स्थानिक पातळीवर सुमारे 550 दिवसांसाठी तैनात केले जाणार आहे. यामुळे अंदाजे 10.2 दशलक्ष मनुष्यबळ रोजगार निर्माण होईल, असे निवेदनात म्हटले आहे. शिवाय, प्रभारी, जिल्हा आणि राज्य पातळीवर तांत्रिक मनुष्यबळ पुरवल्याने क्षमता निर्माण होईल, कारण कामाच्या स्वरूपामध्ये डिजिटल डेटा हाताळणी, देखरेख आणि समन्वय यांचा समावेश असेल. यामुळे त्यांच्या भविष्यातील रोजगाराच्या संधी देखील सुधारतील.

जनगणनेच्या कामासाठी आर्थिक वाटप : केंद्रीय मंत्रिमंडळाने 11,718.24 कोटी खर्चून भारताची जनगणना 2027 करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलीय. जगातील सर्वात मोठी प्रशासकीय आणि सांख्यिकीय प्रक्रिया असल्याने भारताची जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. घरांची यादी आणि गृहनिर्माण गणना, एप्रिल ते सप्टेंबर 2026 आणि लोकसंख्या गणना (PE) - फेब्रुवारी 2027 (केंद्रशासित प्रदेश लडाख आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीर आणि हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांच्या बर्फाच्छादित भागांसाठी जनगणना सप्टेंबर 2026 मध्ये केली जाणार आहे).

## घरात नवीन स्मार्ट वीज मीटर बसविल्याच्या रागातून महावितरण कर्मचाऱ्यावर हल्ला

**कल्याण :** आम्हाला न विचारता घरातील जुना वीज मीटर काढून त्या जागी नवीन स्मार्ट मीटर का बसविला या रागातून अंबरनाथमध्ये एका वीज ग्राहकाने महावितरणच्यावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. मारहाणीत जखम झाल्याने कर्मचाऱ्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. याप्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात महावितरण कर्मचाऱ्याकडून तक्रार दाखल करण्यात आली आहे.दत्तू जाधव असे मारहाण करणाऱ्या वीज ग्राहकाचे नाव आहे. रतीराम सपकाळे असे मारहाण झालेल्या महावितरण जनमित्र कर्मचाऱ्याचे नाव आहे. महावितरण कडून देण्यात आलेली माहिती अशी, की महावितरणच्या अंबरनाथ पश्चिम येथील न्यू कॉलनी शाखा कार्यालयात वरिष्ठ तंत्रज्ञ पदावर कार्यरत असलेले रतीराम सपकाळे हे फॉरेस्ट नाका परिसरात वरिष्ठांच्या आदेशानुसार थकबाकीदार वीज ग्राहकांकडून वीज देयकांची वसूली करीत होते.या परिसरात राहणाऱ्या आरोपी दत्तू जाधव याच्या घरातील जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर यापूर्वी महावितरण कर्मचाऱ्यांकडून लावण्यात आले होते. आपल्या घरातील जुनी वीज मीटर काढताना आणि नवीन स्मार्ट मीटर लावताना आपणास का विचारले नाही याचा राग मनात धरून दत्तू जाधव याने रतीराम सपकाळे यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत मारहाण केली. मारहाण करून दत्तू जाधव घटनास्थळावरून पसार झाले.या मारहाण प्रकरणाची माहिती मिळताच शाखा अभियंता वैभव भोईर तातडीने जखमी सपकाळे यांना घेऊन अंबरनाथ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी आले. तसेच जखमी सपकाळे यांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या घटनेने कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.सपकाळे यांना मारहाण करण्यात आल्याचे समजताच कार्यकारी अभियंता प्रविण चकोले, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, उपकार्यकारी अभियंता जितेंद्र प्रजापती तसेच विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी अंबरनाथ पोलीस ठाण्यात जमा झाले. हल्लेखोर आरोपीवर तातडीने गुन्हा दाखल करून त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी केली. पोलिसांनी दत्तू जाधव याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२(१), १३२,३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. फरार आरोपी दत्तू जाधव याचा शोध पोलीस घेत आहेत. महावितरण कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे हा दंडनीय अपराध आहे.

## महापालिकेत नमाज पठण भोवले! सात जणांवर अटकेची टांगती तलवार

**मालेगाव :** मालेगाव येथील महापालिकेच्या विद्युत विभागात सामुहिक नमाज पठण करणे संबंधित कार्यकर्त्यांच्या अंगलट आले आहे. याप्रकरणी किल्ला पोलिसांनी सात जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून या सर्व संशयीतांवर अटकेची टांगती तलवार उभी राहिली आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

मालेगावातील 'लोक संघर्ष समिती' या संघटनेने शहरात बंद पथदीप सुरू करण्यासाठी महापालिकेकडे मागणी केली होती . मात्र, प्रशासनाकडून दाद मिळत नसल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजीची भावना आहे. याच संदर्भात समितीचे कार्यकर्ते गेल्या सोमवारी महापालिकेत गेले. तिथे विद्युत विभागाच्या अधीक्षकांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात ते गेले. मात्र अधीक्षक बैठकीसाठी बाहेर गेल्याने संबंधित कार्यकर्ते त्यांच्या दालनातच थांबून राहिले. सध्या रमजानचा महिना सुरू असल्याने आणि सायंकाळी ६ वाजता नमाजाची वेळ झाल्यावर कार्यकर्त्यांनी अधीक्षकांच्या दालनातच नमाज पठण सुरू केले. या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर शहरात खळबळ उडाली.

महापालिकेत नमाज पठण करण्याच्या प्रकाराविरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी याप्रकरणी थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करुन कडक कारवाई करण्याची मागणी केली. तसेच सकल हिंदू समाजातर्फे महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांच्या दालनात हनुमान चालीसाचे पठण करून नमाज पठणाला प्रत्युत्तर देण्यात आले. यामुळे शहराचे वातावरण चांगलेच तापले आहे.दरम्यान, विद्युत अधीक्षकांच्या कार्यालयात सामूहिक नमाज पठण करण्याच्या प्रकाराची महापालिका व पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेतली. विद्युत विभागातील कर्मचारी महेंद्र सावंत यांनी यासंदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## राज्यसभेसाठी द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांकडून सात सदस्यांची राज्यसभेसाठी द्विवार्षिक निवडणूक घेण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.



नामनिर्देशन पत्र उमेदवाराला किंवा त्याच्या सूचकाला महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (३) तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विलास गो. आठवले, किंवा सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुभाष नलावडे, किंवा अवर सचिव व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सीमा सचिन तांबे यांच्यापुढे ५ मार्च २०२६ पर्यंत (सार्वजनिक सुट्टी वगळता) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत दाखल करता येतील. नामनिर्देशन पत्रे कक्ष क्रमांक ८०२, आठवा मजला, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई – ४०० ०३२ येथे स्वीकारण्यात येतील. त्याच ठिकाणी व वेळेत नामनिर्देशनपत्रे उपलब्ध राहतील.

नामनिर्देशन पत्रांची छाननी ६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन येथे करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याबाबतची लेखी सूचना ९ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करता येईल.निवडणूक लढविली गेल्यास मतदान १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई येथे होणार आहे.

## वनहक्क पट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे मालकी हक्कासाठी शासन प्रयत्नशील – आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके

**मुंबई :** आदिवासी बांधव, शेतकरी, कामगार, महिला परिचर आणि शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्या विविध मागण्यांसदर्भात शासन सकारात्मक आहे. काही मागण्यांवर कार्यवाही अंतिम टप्प्यात आली आहे. वनहक्क पट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे मालकी हक्क देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यामुळे लॉंग मार्च आंदोलन स्थगित करावे, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील आदिवासी बांधव, शेतकरी, कामगार, महिला परिचर आणि शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात आदिवासी विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत आंदोलकांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली.



बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार विनोद निकोले, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, आदिवासी विकास विभागाचे उपसचिव रवींद्र जाधव, सहसचिव मच्छिंद्र शेळके, किसान सभेचे सचिव अजित नवले आदी उपस्थित होते. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे टीआरटीआयच्या प्र. आयुक्त चंचल पाटील, अपर आदिवासी आयुक्त गोपीचंद कदम उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री वुईके म्हणाले, वनहक्क व सामूहिक वनपट्टेधारक आदिवासी बांधवांकडून आदिवासी विकास महामंडळाने लागू असलेल्या शेतमालावरील बोनसचा लाभ द्यावा. तसेच महामंडळाने या आदिवासी शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करावा. ॲग्रीस्टॅकमधील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमीन धारणाबाबत आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेचा डाटा घेण्यात यावा. त्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव सादर करून पाठपुरावा करण्यात यावा.जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले,आदिवासी विकास महामंडळाने किमान आधारभूत खरेदी किमतीवर हिरडा खरेदी करण्यासाठी बाजारपेठ हस्तक्षेप करावा. त्यासाठी खरेदी केंद्र उघडण्यात यावी. सद्यस्थितीत बाजारात असलेल्या किंमतीपेक्षा जास्त आणि शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, अशाप्रकारे हिरड्याची किमान आधारभूत किंमत ठरवावी. अकोले तालुक्यातील आदिवासी गावांमधील नागरिकांना पाणी मिळण्यासाठी तांत्रिक बाबींवर सर्वेक्षण करण्यात येईल. या गावांना पाणी उपलबध करून देण्यासाठी शासनाकडून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. बांधकाम कामगारांच्या मेडीक्लेम योजनेबाबत बांधकाम कामगार, सूचीबद्ध रूग्णालये आणि नियुक्ती एजन्सीमधील संदिग्धता दूर करावी. त्यासाठी बांधकाम कामगार कल्याण मंडळाने लेखी सूचना निर्गमित कराव्यात.सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, महिला परिचर यांचे मानधनाबाबत मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव आणण्यात येईल. प्रलंबित वेतनाचा प्रश्न निकाली काढण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीसाठी मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. बैठकीला संबंधित विभागाचे अधिकारी, किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन, अहिल्यानगरचे पदाधिकारी उपस्थित होते.

# योगाचार्य स्व. पु. ल. भारद्वाज यांच्या जन्मशताब्दी निमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** इन्स्टिट्यूट ऑफ योग अँन्ड आयुर्वेद (श्री धूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित) आणि आरोग्य सेवा समिती, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने योग केंद्राचे संस्थापक योगाचार्य स्व. पु. ल. भारद्वाज यांच्या जन्मशताब्दी दिनाचे औचित्य साधून 'कृतज्ञता दिन' म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे रक्तदान शिबिर रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १.०० या वेळेत आरोग्य मंदिर, तळमजला, गोदरेज प्लाझा, लोकमान्य टिळक रोड, पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाला श्री साई ब्लड सेंटर, पनवेल यांचे सहकार्य लाभत आहे. विशेष म्हणजे, आरोग्य सेवा समिती मागील २१ वर्षांपासून नियमितपणे रक्तदान शिबिराचे आयोजन करत असून या उपक्रमाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यावर्षीही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन समितीचे अध्यक्ष मधुसूदन जोशी व उपाध्यक्ष सुरेश जाधव यांनी केले आहे. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिओ प्लॅटफॉर्म लिमिटेड चे उपाध्यक्ष श्री. हर्षद आचार्य (बीई,




एमबीए – वित्त) यांच्या हस्ते होणार आहे.

रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी सूर्यकांत फडके (मो. ९९६९० १०५७९) किंवा सतीश देशमुख (मो. ९८२०३ ३१७०१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.योगाचार्य स्व. पु. ल. भारद्वाज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या रक्तदान शिबिरातून समाजात रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित होऊन गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे

# मनोरुग्णांसाठी देवदूत ठरलेल्या शिंदे दाम्पत्याचा यवतमाळकरांकडून नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : नंददीप फाउंडेशनच्या माध्यमातून रात्रंदिवस मनोरुग्णांची सेवा करणारे हाँगकाँग येथील द वन इंटरनॅशनल ह्युम्याटेरियन अवॉर्ड विजेते संदीप बाबाराव शिंदे ,नंदिनी संदीप शिंदे या दाम्पत्याच्या सर्व यवतमाळकर आणि नागरी सत्कार आयोजन समितीच्या वतिने सोमवारी रंगोली ग्राउंड वर नागरी सत्कार करण्यात आला नंददीपचे कार्य अविरत सुरू राहावे यासाठी यवतमाळकर शिंदे दाम्पत्याच्या कायम पाठीशी राहिल अशि ग्वाही मान्यवरानी दिली कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर विजय कावलकर वक्ते संतोष आरसोड प्रमुख अतिथी विजय इंगोले ,प्राध्यापक विवेक देशमुख, प्रशांत बनगिनवार ,जीवन लाभसेटवार, प्रवीण कापरतीवार, प्रदीप ओमनवार ,राजेश गडेकर राजीव उपस्थित होते. संतोष




आरसोड यांनी नंददीप फाउंडेशनच्या माध्यमातून वेड्यांसाठी काम करणारे संदीप शिंदे नंदिनी शिंदे हे दांपत्य ध्येयवेडे आहेत.बापाच्या संपत्तीचा वारसदार होणे खूप सोपे असते .परंतु संतांच्या विचाराचा वारसदार होणे कठीण असते.मनोरुग्णांसाठी जीवन समर्पित करणारा संदीप शिंदे खऱ्या अर्थाने संत गाडगेबाबांचा वारसदार आहे. अशी प्रतिपादन केले. डॉक्टर विजय कावलकर म्हणाले संदीप शिंदे हे सत्काराच ओझ घेऊन न जगता कामात मग्न राहणारा माणूस आहे.नंददींचे काम नक्की पुढे नेले जाईल अशी ग्वाही दिली सुरुवातीला डॉक्टर प्रशांत गावंडे यांनी हाँगकाँग येथील पुरस्काराची माहिती दिली सत्काराला उत्तर देताना संदीप शिंदे म्हणाले विविध एनजीओ संस्था संघटना दानशूर यांनी पदरात घेतल्याने नंददीपचे कार्य अविरत सुरू आहे. सर्व सन्मान पुरस्कार मी या सर्वांना समर्पीत करतो असे सांगितले प्रा. घनश्याम दरने प्रास्ताविक मंगेश खुणे यांनी संचालन केले तर ताराचंद कंठाळे यांनी आभार मानले कार्यक्रम स्थळी संदीप शिंदे यांना आजवर मिळालेल्या पुरस्काराची दालन उभारण्यात आले होते. नागरी सत्कार सोहळयाला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी तहसीलदार डॉक्टर योगेश देशमुख यांच्यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती एनजीओ संस्थाचे पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते 'मानवतेचा दूत उपाधी संदीप शिंदे यांना प्रधान 'नागरी सत्कार कार्यक्रमास संदीप शिंदे यांना मानवतेचा दूत उपाधी हरी ओम भूत, मंजू देवी भूत, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी माजी मंत्री शिवाजीराव मोघे लोकमतचे कार्यालय प्रमुख किशोर दर्डा अखिल भारतीय बंजारा समाजाचे अध्यक्ष डॉक्टर टीसी राठोड डॉक्टर सुरेंद्र पद्मावार उपस्थित होते मान्यवरांचे हस्ते संदीप शिंदे यांचे वडील बाबाराव आणि लताबाई यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच ,नंददीप फाउंडेशन साठी सेवा देणाऱ्या डॉक्टर यांचा सन्मान करण्यात आला, निशान सायरी कार्तिक भेंडे स्वप्निल सावळे अक्षय बानोरे विकी एकोणकार कृष्णा मुळे भोजराज गजबे भवन घोडेश्वर नरेंद्र पवार स्नेहलता मदनगर महेश कळसकर डॉक्टर श्रीकांत मिश्रा डॉक्टर प्रशांत कसारे डॉक्टर विजय मुन डॉक्टर प्रवीण राखुंडे डॉक्टर हर्षलता गायनार डॉक्टर राधिका धलवार डॉक्टर अमर सुरजूसे डॉ. कविता बोरकर आदिना सन्मानित केले त्यावेळी संदीप शिंदे यांच्या मनोरुग्न सेवेची चीत्रफीत हि दाखवण्यात आली.

# पालोदकर विद्यालयाचे १८ विद्यार्थी 'एनएमएमएस'मध्ये पात्र

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा आपली मोहर उमटवली आहे. २८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) विद्यालयाचे तब्बल १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.या गौरवशाली यशात गौरी साबळे, समीक्षा गायकवाड, तेजस्विनी पालोदकर, प्राजक्ता वाघ, जानवी थोरात, निकिता सोन्ने, संध्या लोखंडे, प्रिया बावस्कर, रुद्र दांगोडे, गायत्री लोखंडे, वैष्णवी सूळ, कनिका डफळ, मयुरी पाडळे, सोहम समिंद्रे, सुमित वैद्य, अंजली लोखंडे,



भूमिका ठाकूर आणि श्रावणी दांडगे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकरराव पालोदकर, सचिव डॉ. राहुल पालोदकर व प्राचार्य अशोक पंडीत यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक कृष्णा पाटील, सुनील सागरे व गजानन सपकाळ यांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी माहिती देताना प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी सांगितले की, "एन.एम.एम. एस . परीक्षेत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना यापूर्वी वार्षिक ६ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. मात्र, मागील दोन वर्षांपासून ही रक्कम वाढवून वार्षिक १२ हजार रुपये करण्यात आली आहे. या वाढीव शिष्यवृत्तीचा आर्थिक दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी खूप मोठा लाभ होत आहे." या यशाबद्दल शाळेतील शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, राजेश ठोंबरे, प्रा. योगेश निंभोरे, सुनील तांबे, भास्कर केरले, प्रफुल्ल कळम, डॉ. रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे.

# घाटंजीत स्वच्छतादूत संत गाडगे बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/ महेश पेन्दोर** : स्वच्छतेचा संदेश देणारे महान संत गाडगे बाबा यांची जयंती घाटंजी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विश्वस्नेह फाउंडेशन आणि राष्ट्रनिर्माण विचारधारेच्या शिलेदारांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मारवार पेट्रोल पंपाच्या मागे असलेल्या नगर परिषदेच्या खुल्या जागेत हा कार्यक्रम पार पडला. या नियोजित उपक्रमाचे हे पहिलेच वर्ष होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याधिकारी राजू घोडके यांच्या हस्ते झाले. यावेळी नगर परिषद अध्यक्ष परेश कारिया, उद्योजक सागर मारवार, सामाजिक कार्यकर्ते मधुकर निस्ताणे, सारंग काहळे, नगर परिषद सदस्या श्वेता दिकुंडवार, निखिल देठे, भारती कुंटलवार, मेश्राम आणि रमेश दुल्लरवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित




होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.या सोहळ्यात शालेय चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गाडगे बाबांच्या जीवनावर आधारित भजने, अभंग आणि स्वच्छतेची गीते सादर करून सर्वांची मने जिंकली. मुलांवर लहान वयातच स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेचे संस्कार व्हावेत, या उद्देशाने राष्ट्रनिर्माण विचारधारा ही संस्था कार्य करत आहे. ही जागा भविष्यात 'बाल संस्कार केंद्र' म्हणून विकसित केली जाणार असून, तिथे थोर महापुरुषांचे चरित्र सांगणारे दालन लोकसहभागातून उभारले जाईल, असे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात वक्त्यांनी गाडगे बाबांच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन आणि स्वच्छतेसाठी दिलेला लढा आजच्या काळातही किती महत्त्वाचा आहे, हे पटवून दिले. "स्वच्छता हीच खरी सेवा" हा मंत्र प्रत्येकाने पाळावा आणि आपले गाव सुंदर बनवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. समाजातील वाईट घटना थांबवण्यासाठी मुलांमध्ये चांगले विचार रुजवणे गरजेचे असल्याचे मत पालकांनीही व्यक्त केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पांडुरंग किरणापुरे, संतोष गोल्हर, संतोष वानखेडे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली.



**महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांचे आज नागपूर विमानतळ येथून प्रस्थान झाले. राज्यपाल आचार्य देवव्रत, एयर मार्शल यल्ला उमेश, मेजर जनरल एन एस सोहल, आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर व मान्यवर यावेळी उपस्थितीत होते. ( दैनिक युवक आधार )**

# इंद्रराज महाविद्यालयात 'आजीवन शिक्षण' विस्तार विभागाची दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:** येथील इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय कार्यशाळा नुकतीच उत्साहात पार पडली. २३ व २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या या कार्यशाळेत तज्ज्ञांनी व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा, लेखन कौशल्य आणि उद्योजकता या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी प्रोफेसर काकासाहेब बंदर यांनी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. "यशस्वी होण्यासाठी केवळ शैक्षणिक गुणवत्ता पुरेशी नसून त्याला उत्तम व्यक्तिमत्त्वाची जोड असणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांनी आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि वेळेचे नियोजन यावर भर दिला.

दुसऱ्या सत्रात प्रोफेसर अशोक पवार यांनी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' करताना बदलता अभ्यासक्रम आणि अभ्यासाचे नियोजन यावर सविस्तर भाष्य केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सत्रांचे अध्यक्षस्थान प्रोफेसर संतोष चौथाईवाले यांनी भूषविले, तर उपाध्यक्ष म्हणून डॉ. सविता म्हस्के उपस्थित होत्या. दुसऱ्या दिवशी प्रोफेसर अनिरुद्ध मोरे यांनी 'लेखन व संभाषण कौशल्य' यावर सखोल मार्गदर्शन करताना भाषेची शुद्धता आणि विचारांच्या मांडणीचे महत्त्व स्पष्ट केले. तर दीपक राऊत यांनी 'नर्सरी उद्योगातील संधी' या विषयावर बोलताना सांगितले की, नर्सरी व्यवसाय हा कला, विज्ञान आणि व्यवस्थापन यांचा संगम आहे. योग्य बाजारपेठ अभ्यासल्यास हा व्यवसाय अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. या सत्रांचे अध्यक्षस्थान डॉ. मनीषा मुंगळीकर यांनी तर उपाध्यक्ष म्हणून डॉ. सुचित देशमुख यांनी काम पाहिले कार्यशाळेच्या समारोप सोहळ्याचे अध्यक्षस्थान प्राचार्य जी. जी. राजपूत यांनी भूषविले. यावेळी उपप्राचार्य प्रोफेसर व्यंकटेश लांब यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रुपाली बिरादार यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी आजीवन शिक्षण विभागाचे समन्वयक प्रोफेसर जलिंदर अंभोरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रा. अंभोरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# कृषी क्षेत्रातील सौर ऊर्जेच्या कामगिरीसाठी महावितरणला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड

**दैनिक युवक आधार**

**जोत्स्ना करवाडे/नागपूर** : राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. २४) २०२६ च्या बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तब्बल १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मितीसाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही




या योजनेला मोठी गती दिली आहे.

बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डसाठी रस्ते, बंदरे, वीज, शहरी वाहतूक, पाणी आदी ८ क्षेत्रांतील पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येते. यंदा देशातील सुमारे १४५ प्रकल्पांचे मूल्यमापन करून निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांच्या अध्यक्षतेखालील २५ सदस्यांच्या निवड समितीने पुरस्कारांसाठी प्रकल्पांची निवड जाहीर केली. यात वीज क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणची देशपातळीवर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.जगातील सर्वांत मोठा विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १० लाख २५ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत.शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अत्यंत उपयुक्त ठरत आहे. नवी दिल्ली येथे महावितरणचा बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# सिल्लोड न्यायालयात आनंद सुरडकर यांची सहाय्यक अधीक्षक पदी पदोन्नती

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:** येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरातील वरिष्ठ लिपिक श्री. आनंद सुरडकर यांना पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती आता याच न्यायालयात 'सहाय्यक अधीक्षक' (वित्त व लेखा विभाग) या पदावर झाली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री. एस. एस. देशमुख, न्यायाधीश के . टी. अढायके, सह दिवाणी न्यायाधीश श्री. एम. व्ही. किरमे, दुसरे सहन्यायाधीश श्री. ए. एच.



तट्टू आणि तिसरे सह दिवाणी न्यायाधीश यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अशोक दादा तायडे, सर्व वकील सदस्य, न्यायालयीन कर्मचारी आणि पत्रकार बांधवांनी सुरडकर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# भंडाऱ्यात भुरट्या चोरांचा सुळसुळाट; तात्काळ कारवाईची नागरिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा** शहर व परिसरात अलीकडच्या काळात भुरट्या चोरांच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरासमोर उभ्या असलेल्या दुचाकी, सायकली, तसेच दुकानांसमोरील वस्तू चोरीस जाण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. काही ठिकाणी रात्रीच्या वेळी बंद घरांच्या दरवाज्यांवर हात साफ करण्याचे प्रकारही समोर आले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, चोरटे रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत गल्ल्या-बोळांमध्ये फिरत असून, सीसीटीव्ही नसलेल्या भागांना विशेष लक्ष्य करत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली असून, अनेकांनी रात्री पहारा ठेवण्यास सुरुवात केली आहे.या वाढत्या घटनांमुळे पोलीस प्रशासनाच्या गस्त पथकांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांनी शहरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर कडक नजर ठेवावी तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी केली आहे.भुरट्या चोरीच्या घटनांवर वेळीच आळा घालून नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# कुर्ली गावात रंगला 'सामाजिक समरसता' सोहळा; महंत योगेश महाराज पुरींचे प्रभावी प्रबोधन

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी /महेश पेन्दोर** : घाटंजी तालुक्यातील कुर्ली येथे आपल्या समाजात एकता आणि बंधुभाव वाढावा, या उदात्त हेतूने घाटांजी तालुक्यातील कुर्ली येथे 'सामाजिक समरसता' कार्यक्रमाचे दिमाखात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कुर्ली ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११:३० वाजता झाली. विदर्भ प्रांत समरसता गतिविधी प्रमुख आनंदिदासजी पाळेकर यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते महंत योगेश महाराज पुरी यांनी आपल्या साध्या आणि सोप्या भाषेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. "समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांशी प्रेमाने आणि आदराने वागले पाहिजे," असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी दिला. आनंदमठ झटाळा येथील श्री संत शाहपूरी महाराज यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन अजय पोलकमवार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक समितीचे अध्यक्ष अशोक यमसनवार यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तात्रय उसकेमवार, नरहरी पोलकमवार, गोविंदा चौधरी, भगवान रुद्राक्षवार, संतोष अक्केवार, सुशांत रेड्डीवार, रोहित मंत्रिवार आणि गजानन सुंकटवार यांनी परिश्रम घेतले.

तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रेम वेट्टी आणि कुर्लीतील सर्व गावकरी मंडळींनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मोठी मेहनत घेतली. कुर्लीकरांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे संपूर्ण घाटांजी तालुक्यात कौतुक होत आहे.

# दैनिक युवक आधारचा पाठपुरवठा : मालेगाव–आमखेडा रस्ता मृत्यूचा सापळा

## बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यान खड्ड्यांचे साम्राज्य

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव (वाशिम)मालेगाव ते आमखेडा हा ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा मार्ग सध्या पूर्णपणे दुरवस्थेत गेला असून नागरिकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. विशेषतः बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यान रस्त्यावर मोठमोठे व खोल खड्डे पडले असून अनेक ठिकाणी डांबरीकरण पूर्णपणे उखडले आहे. परिणामी वाहनधारकांना मोठ्या जीवित धोक्याचा सामना करत प्रवास करावा लागत आहे.



या मार्गावरून दररोज शेतकरी दूध, भाजीपाला व इतर शेतीमाल घेऊन बाजारपेठेत जातात. तसेच शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा या रस्त्यावरून होत असते. मात्र रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी वाहनचालकांना खड्डे चुकवण्यासाठी अचानक ब्रेक मारावे लागत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

या रस्त्याची अवस्था इतकी गंभीर बनली आहे की येथील नागरिकांच्या जीविताला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला असून अपघात होण्याची शक्यता कायम आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरत आहे. अंधारात खड्डे दिसत नसल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक दुचाकीस्वार खड्ड्यांमुळे घसरून पडल्याच्या घटनाही घडल्या असून सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे.

या रस्त्यामुळे वयोवृद्ध नागरिकांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. पायदळ चालताना कंबर दुखणे, कमरेचा त्रास वाढणे, गुडघेदुखी वाढणे अशा शारीरिक वेदना सहन कराव्या लागत आहेत. सततच्या धक्क्यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून या रस्त्यामुळे विविध आजार उद्भवत असल्याचेही निदर्शनास येत आहे. त्यामुळे हा रस्ता नागरिकांसाठी केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे.

> “ **रस्त्यावर मोठे खड्डे पडल्यामुळे प्रवास करताना जीव धोक्यात येतो. वाहनांचे नुकसान होत असून तात्काळ दुरुस्ती करावी.**
> **– सुनील घुगे बोरगांव**
>
> “ **शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्ता दुरुस्त करावा.**
> **– संतोष धोंगडे पिंपळा**
>
> “ **हा रस्ता अपघाताला आमंत्रण देत आहे. त्वरित डांबरीकरण न झाल्यास नागरिक आंदोलन करतील.**
> **– संतोष जोगदंड आमखेडा**

या मार्गावरून दररोज शेकडो वाहनांची ये-जा होत असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. ग्रामस्थांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

दैनिक युवक आधारच्या पाहणीत बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यान रस्त्याची अवस्था अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचा डांबरी थर पूर्णपणे निघून गेला असून दगड-खडी उघडी पडली आहे. काही ठिकाणी इतके खोल खड्डे पडले आहेत की वाहनचालकांना रस्ता सोडून बाजूने वाहन चालवावे लागत आहे. हा रस्ता आता प्रवासाचा मार्ग नसून अपघाताचा सापळा बनला आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या मते, हा रस्ता ग्रामीण भागातील जीवनवाहिनी असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. एखाद्या नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

**दैनिक युवक आधारचा सवाल..**

मालेगाव–आमखेडा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल का घेतली नाही? अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल दैनिक युवक आधार उपस्थित करत आहे.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज 2026 'सेवा रत्न' पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/ भीमराव गावडे :** गेवराई समाजसेवेचा वसा घेतलेल्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा काल राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कारा'ने गौरव करण्यात आला. संघर्ष सामाजिक धान्य बँक आयोजित हा सोहळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गेवराई येथे मोठ्या थाटात पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री दत्तामामा बारगजे आनंदग्राम पाली व प्रमुख उपस्थिती म्हणून मा.गीताभाभी बाळराजे पवार नगराध्यक्ष नगरपरिषद गेवराई. मा.प्रवीण कुमार काळमपाटील




साहेब, गटशिक्षण अधिकारी गेवराई. मा.संजय सोनवणे, नायब तहसीलदार गेवराई. मा.रामकुमार राव अग्रवाल उद्योजक व समाजसेवक जालना. मा.प्रीती संतोष दादा गर्जे ,बालग्राम गेवराई. मा कर्ण तांबे आजोळ परिवार शिरूर कासार.यांनी आपली मनोगते केली . तसेच दरवर्षीप्रमाणे यावर्षी सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित मा माधवराव पवार, मा धनंजय सुलाखे, मा नामदेव चौधरी,मा भारत चव्हाण, मा विकास घोडके, ह भ प योगेश महाराज गायके,मा आप्पासाहेब महानोर, मा शितलताई साखरे, मा ज्ञानेश्वर पिंगळे,मा, लातूर पॅटर्न क्लासेस गेवराई व गेवराई तालुका व्यापारी महासंघ यांना सेवा रत्न पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला. या कार्यक्रमास आलेल्या प्रमुख अतिथींचा परिचय समाजसेवक सुभाष काळे सर यांनी दिला व राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवा रत्न पुरस्कार सोहळ्याचे प्रास्ताविक माननीय सुरेश भोपळे सर यांनी केले.कार्यक्रमाचे स्वागत श्री शिवाजी झेंडेकर सर तसेच आभार प्रदर्शन डॉक्टर संजय पांढरे सर यांनी केले व कार्यक्रमाचे बहाद्दर सूत्रसंचालन श्री धर्मराज करपे सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून संघर्ष सामाजिक धान्य बँकेचे संचालक श्री बाळासाहेब गावडे व भारत भाऊ साळुंखे यांनी सर्वत्र नियोजन पूर्णत्वास नेले. या कार्यक्रमांमध्ये सेवारत्न पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या मान्यवरांचे देखील मनोगत झाले यामध्ये मा धनंजय सुलाखे सर ,ह भ प योगेश महाराज गायके , मा अप्पा महानोर, मा शितलताई साखरे, मा ज्ञानेश्वर पिंगळे, लातूर पॅटर्न क्लासेसचे पुणेकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच उचललेला समाज सेवेचा विडा अजून जबाबदारीने निभाऊ असं सर्व समुपदेश देखील केले. हा सुंदर सोहळा संघर्ष सामाजिक धान्य बँकेने आयोजित केला होता त्यात मान्यवरांनी देखील या कार्यक्रमाचे व आलेल्या सर्व पाहुणे मंडळींनी देखील निवडलेल्या सेवा रत्न पुरस्काराचे कौतुक केले व हा कार्यक्रम सदैव सातत्यपूर्ण चालत राहावा यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# लोकप्रतिनिधींचा सन्मान राखा ,अन्यथा शिस्तभंगाची कारवाई– तहसीलदारांचे कर्मचाऱ्यांना फर्मान

**दैनिक युवक आधार**

**येनस वार्ताहर/प्रदिप रघुते** : शासकीय कार्यालयामध्ये येणाऱ्या लोकप्रतिनिधींना योग्य मान सन्मान देणे आणि त्यांच्याशी शिस्तबद्ध वर्तन करणे हे हे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बंधनकारक आहे या शिष्टाचाराचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कडक प्रशासकीय कारवाई करण्याचा इशारा नांदगाव खंडेश्वर च्या तहसीलदारांनी एका अधिकृत आदेशाद्वारे दिला आहे. *काय हाय नेमके कारण ?* नगरपंचायत नांदगाव खंडेश्वर च्या प्रभाग क्रमांक 14 च्या नगरसेविका प्राजंली राहुल गुल्हाने यांनी 29 जानेवारी 2026 रोजी तहसील कार्यालयाला एक पत्र दिले होते या पत्रामध्ये त्यांनी प्रशासकीय कामकाजा दरम्यान लोकप्रतिनिधींशी होणाऱ्या संवादातील त्रुटी आणि शिष्टचाराच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले होते या आदेशामुळे आता शासकीय कार्यालयांमध्ये लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांचेतील सुसंवाद वाढण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे या तक्रारीची दखल घेत तहसीलदारांनी सर्व अधिनस्त कर्मचाऱ्यांसाठी' 'प्रोटोकॉल' निश्चित केला आहे. *प्रशासनाला दिलेले मुख्य निर्देश* तहसीलदारांनी निर्गमित केलेल्या आदेशात प्रामुख्याने खालील बाबींवर भर दिला आहे उभे राहू स्वागत करणे कोणताही लोकप्रतिनिधी कार्यालयात आल्यास कर्मचाऱ्यांनी उभे राहून त्यांचे स्वागत करावे त्यांना बसण्यासाठी आसन व्यवस्था उपलब्ध करन द्यावी सौजन्यपुर्ण भाषा: संवाद साधतांना अरेरावी किंवा अनौपचारिक भाषेचा वापर टाळुन केवळ आदरार्थी आणि संयमी भाषेचाच वापर करावा कामात तत्परता: लोकप्रतिनिधींनी जनहिताच्या कामाबाबत विचारणा केल्यास नियमांच्या अधीन राहून त्यांना वस्तूनिष्ठा माहिती त्वरित द्यावी कामात विनाकारण विलंब लावू नये.

**लोकप्रतिनिधी हे जनतेचे निवडून दिलेले प्रतिनिधी आहेत प्रशासकीय कामात सुसुत्रता आणि लोकशाहीचे मूल्य टिकवण्यासाठी त्यांच्याशी सन्मानाने जगणे हे प्रत्येक शासकीय सेवकांचे कर्तव्य आहे.**
**अश्विनी जाधव. तहसीलदार नांदगाव खंडेश्वर**

# महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी नांदेड येथे 'शिवजन्मोत्सव सोहळा–2026' निमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नांदेड (प्रतिनिधी) :** महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी नांदेड येथे 'शिवजन्मोत्सव सोहळा–2026' च्या औचित्याने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत रक्तदान करून मानवतेचा अनोखा सदेश दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी विचारांमधून समाजसेवेची शिकवण घेत विद्यार्थ्यांनी "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या भावनेतून स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. शिबिरात विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही रक्तदान करून उपक्रमाला भक्कम पाठबळ दिले.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी शिवजन्मोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करत समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. रक्तपेढीच्या तज्ज्ञ पथकाने सर्व वैद्यकीय निकषांचे पालन करून सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने रक्तसंकलन




प्रक्रिया पूर्ण केली. या शिबिरात लक्षणीय संख्येने रक्तदात्यांनी सहभाग घेत अनेक रुग्णांना जीवनदान देण्याचा संकल्प साकार केला. संपूर्ण परिसरात उत्साह, सामाजिक जाणीव आणि सेवाभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे संचालक डॉ. एस. डी. मोरे, प्राचार्य डॉ. पि. ए. सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्राध्यापक के. आर. उदासी, प्राध्यापक डॉ. पि. एच. नांदेडकर, प्राध्यापक डॉ. पी. यू. ढोणे, प्राध्यापक डि. एस. एंगडे, प्राध्यापक वाय. एम. नादरे तसेच श्री. गणेश खल्लाळ यांची आवर्जुन प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्राध्यापक के.आर.उदासी, कार्यक्रम सहाय्यक अधिकारी श्री. जि.एस.कदम, NSS स्वयंसेवक विद्यार्थी व सर्व सहकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले. 'शिवजन्मोत्सव सोहळा–2026' निमित्त आयोजित या रक्तदान शिबिरामुळे महाविद्यालयाच्या सामाजिक कार्याची परंपरा अधिक दृढ झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक बळकट झाली

# मिशन सी हजार चित्रपट देशभरात सहा मार्चला होणार रिलीज, प्रसिद्ध अभिनेता आणि निर्देशक तेजेश्वर रजनीकांत बोरेलें यांचे मित्र-सर्वम बोरेले

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/जितेंद्र खोडे** :दक्षिण भारताच्या सिने-सृष्टिचा सुप्रसिद्ध अभिनेता आणि निर्देशक तेजेश्वर यांच्या एसवी क्रिएशनची बहु प्रतिक्षित देशभक्तिने भरपूर व ऐक्शन थ्रिलर चित्रपट दिनांक ६ मार्च २०२६ रोजी संपूर्ण भारतात रीलीज होणार आहे. हया चित्रपटचा अभिनेता आणि निर्देशक तेजेश्वर हा व्हिसल ब्लोअर, जिंदल पुरस्कार विजेता आणि अपक्ष संचालक,रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा घनिष्ट मित्र आहे.अभिनेता आणि निर्देशक श्री तेजेश्वर यांच्या निर्देशनात मिशन सी 1000, हा चित्रपट तयार करण्यात आला असून हिंदी,तेलगु सहित अनेक भाषेत एकाच वेळी प्रदर्शित होणार आहे.हया चित्रपटात रोमांचक,एक्शन नाट्य, देशभक्ति,विज्ञान,सामाजिक, प्रभावशाली असून हिंदुत्व आणि युवा पिढीला आपल्या संस्कारने जोडणारी असून आतंकवाद




संघटनचा रोष, राष्ट्रहित,वैज्ञानिक प्रयोग अश्या प्रंचड रोमांचक चित्रपट मिशन सी 1000, आहे,कथन श्री राम,अभिनेता (तेजेश्वर)यांच्या जवळ-जवळ दाखविण्यात आली आहे समाजाला प्रेरणा देणारी अशी चित्रपट तरुण पीढ़ी ने आणि पुरुष व महिला यांनी अवश्य पहावे असे आव्हान रजनीकान्त डालूरामजी बोरेले यांनी केले आहे,एसवी क्रिएशनची "Mission C1000 * 6 मार्च ला रिलीज होत असलेल्या चित्रपट मध्ये प्रज्ञा नयन,कबीर दुहन सिंह,संजय पांडे,जया प्रकाश,अनीश रुवेला, सुद्धा सारख्या कलकारांची महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे कालीचरण महाराज हे विशेष उपस्थितीत दिसणार आहे.

निर्माता:-किरणमयी,विराट एवं शौर्य पटकथा,संवाद व निर्देशन:-तेजेश्वर बैनर:-एसवी क्रिएशन (टॉलीवुड) छायांकन :-महेंद्र एस.संगीत:-श्रीधर आत्रेय संपादन:-मार्तंड के.वेंकटेश (अन्नपूर्णा स्टूडियोज) एक्शन निर्देशन:-स्टंट जोशुआ कोरियोग्राफी:-गणेश स्वामी वीएफएक्स:-अनंत इय्युन्नी साउंड डिजाइन (७/१एटमॉस): कृष्णा मार्केटिंग एवं प्रमोशन मीडिया फोर्थ हे आहेत,भव्य लोकेशन्स, प्रभावशाली बैकग्राउंड म्यूजिक, आधुनिक तकनीकी असुंन चित्रपटाचा आधिकारिक टीज़र एसवी क्रिएशनच्या यूट्यूब चैनल वर प्रसारीत केला आहे. प्रेक्षक वर्गाकडून प्रचंड सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहे.महत्वाची बाब म्हणजे चित्रपटाचे अभिनेता तेजेश्वर आणि अभिनेत्री हे पांढरकवडा येथे रजनीकांत बोरेले यांच्या भेटीला आणि प्रोग्राम ला येणार आहे हे विशेष.

# समर्थ कृषी विद्यालय देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा यांचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष सात दिवसीय निवासी शिबिराचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**चिखली तालुका प्रतिनिधी / श्री सिद्धार्थ धंदरे** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था संचालित समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा जि. बुलढाणा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस विशेष सात दिवसीय निवासी शिबिराचे उद्घाटन सावखेड भोई येथे उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सतीश कायंदे हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून दादाराव मुसदवाले गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती देऊळगाव राजा, संजय मुंदानकर मुख्याध्यापक, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, सावखेड भोई उपस्थित होते.कार्यक्रमाची प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात सतीश कायंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामस्थांकडून शेतीतील अनेक पारंपरिक व उपयुक्त बाबी शिकण्याची ही उत्तम संधी आहे. ग्रामीण भागातील अनुभवसंपन्न शेतकऱ्यांकडून नवनवीन तंत्रे व व्यवहारज्ञान आत्मसात करावे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांनीही कृषी क्षेत्रातील विकसित व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती ग्रामस्थांना करून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. अशा उपक्रमांमधून समाजकार्याची जाणीव अधिक दृढ होते आणि समाजाप्रती असलेले आपले योगदान प्रभावीपणे पार पाडण्याची संधी मिळते, असेही त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.प्रमुख उपस्थितीत मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी दादाराव



मुसदवाले यांनी सांगितले की, शालेय व महाविद्यालयीन जीवनात ते स्वतः राष्ट्रीय सेवा योजनेचे सक्रिय सदस्य होते. त्यामुळे एनएसएसच्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांना विशेष आपुलकी असून त्यांनी विद्यार्थ्यांना मनोगतपूर्वक मार्गदर्शन केले.

जीवनातील मूल्यांची जपणूक करत शेतकऱ्यांप्रती आस्था व आत्मीयता वृद्धिंगत करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी तळागाळापर्यंत जाऊन समजून घेतल्यास त्यावर प्रभावी उपाययोजना करता येतात, असेही त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.शाळेचे मुख्याध्यापक संजय मुंदनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आवाहन केले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने व जबाबदारीने सहभाग घ्यावा. या शिबिरातून जीवनातील नवनवीन मूल्ये आत्मसात करा, असे त्यांनी सांगितले.तसेच येथे मिळणारे अनुभव आणि शिकवण पुढील व्यावहारिक आयुष्यात निश्चितच उपयुक्त ठरतील, असेही त्यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश चगदळे व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी जाधव यांनी शिबिराच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली. संतोष टेकाळे, दिलीप चेके, गणेश हांडे, दत्ता जाधव, महेंद्र जाधव , पांडुरंग सोनुने, गजानन शेळके हिम्मत जाधव, भास्कर जाधव, राहुल खंडागळे तसेच प्रा. विकास म्हस्के, प्रा. वैभव देशमुख, सय्यद असिम यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.या विशेष निवासी शिबिराच्या माध्यमातून पाणलोट व्यवस्थापन, पडीत जमीन विकास, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, कृषी -पशु समृद्धी, आरोग्य शिबिर इत्यादी कार्यक्रमांचा समावेश केलेला आहे. ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य जनजागृती, शैक्षणिक मार्गदर्शन व विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना समाजाभिमुख कार्यासाठी प्रेरित करत राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती मोरे आणि अंकिता काळे हिने केले तर स्वागत गीत WW सिरीज च्या मुलींनी म्हटले. आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गौरी सोळंकीने केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम नियोजनासह पार पडला.

## ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावल्याचा आरोप; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**भंडारा जिल्हा प्रतिनिधी/ भावेश धंधुकीया** : लाखनी ग्रामपंचायत कमेटी सावरी/ मुरमाडी येथील काही पदाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना काम करण्यापासून रोखून ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिपराज इलमकार यांनी केला आहे. या प्रकारामुळे शासकीय कामकाज ठप्प होऊन नागरिकांच्या कामात अडथळे निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.याबाबत डॉ. इलमकार यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती लाखनी यांना लेखी नोटीस देत संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे,



दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत कमेटीच्या काही सदस्यांनी कर्मचाऱ्यांना कार्यालयीन काम करण्यास मज्जाव केला व ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. त्यामुळे संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, महाराष्ट्रातील विविध संघटनांनी या घटनेची दखल घेत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास १२ मार्च २०२६ पासून पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायत प्रशासनातील कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## संविधानिक मूल्यांच्या अधिष्ठानावरच सक्षम नेतृत्व घडते” — आशिष धोंगडे

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि संविधानिक मूल्यांविषयी दृढ बांधिलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने अनुभव शिक्षा केंद्र, वाशिम यांच्या वतीने श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय, कारंजा अंतर्गत ग्राम येवता (बंदी) येथे राष्ट्रीय सेवा योजना आयोजित श्रमसंस्कार विशेष शिबिरात “नेतृत्व बांधणी आणि संविधानिक मूल्ये” या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेत युवक-युवतींना प्रभावी नेतृत्वासाठी आवश्यक असलेली तत्त्वे, निर्णयक्षमता, उत्तरदायित्वाची जाणीव आणि समाजाभिमुख दृष्टीकोन याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची ओळख करून देत लोकशाहीच्या बळकटीसाठी संविधानिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात



आले.

अनुभव शिक्षा केंद्राच्या मूलभूत मूल्यांमध्ये धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता, प्रामाणिकपणा, उत्तरदायित्व, श्रमप्रतिष्ठा आणि पर्यावरण संवर्धन यांचा समावेश असून या सर्व मूल्यांची माहिती युवकांना प्रभावी पद्धतीने देण्यात आली. तसेच अनुभव शिक्षा केंद्रांतर्गत राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम, राज्यस्तरीय युवा अभ्यासक्रम आणि “अनुभव कट्टा” या उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यशाळेदरम्यान स्त्री-पुरुष समानतेवर आधारित विशेष कृती सत्र घेण्यात आले. युवक व युवतींनी सक्रिय सहभाग नोंदवत समानतेचा संदेश प्रभावीपणे सादर केला. या उपक्रमामुळे युवकांमध्ये संविधानिक मूल्यांबद्दल जागरूकता वाढीस लागली असून सामाजिक परिवर्तनासाठी नेतृत्वाची दिशा मिळाली.

या प्रसंगी मार्गदर्शक म्हणून अनुभव साथी मा. आशिष धोंगडे यांनी संविधानिक मूल्यांच्या अधिष्ठानावरच सक्षम व जबाबदार नेतृत्व घडू शकते, असे प्रतिपादन केले. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी मा. प्रा. राठोड व कार्यक्रम अधिकारी मा. बरडे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कारंजा तालुक्यातील युवक-युवती मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभागी झाले होते. श्रमसंस्कार विशेष शिबिरात आयोजित या कार्यशाळेमुळे युवकांमध्ये नेतृत्वाची जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून हा उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

## आत्महत्याग्रस्त वडिलांच्या मुलीच्या लग्नासाठी गोपाळ समाज धावला; युवक जोडो अभियानाची मोलाची मदत

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव (वाशिम) पांगरी नवघरे येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर गोपाळ समाजाने एकजुटीचे व मानवतेचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. आर्थिक अडचणींमुळे मुलीच्या लग्नाचा खर्च भागवणे शक्य नसल्याने राजू कालापाड या गोपाळ समाज बांधवांनी आपल्या शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असतानाच समाजाने या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत दिलासा देण्याचे कार्य केले.

या अत्यंत वेदनादायी प्रसंगाची दखल घेत महाराष्ट्र राज्य गोपाळ समाज युवक जोडो अभियान यांनी तात्काळ पुढाकार घेत मृतकाच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आंदण म्हणून दिल्या. अभियानामार्फत एक फ्रिज व एक कुलर देण्यात आले असून, या मदतीमुळे संबंधित कुटुंबाला मोठा मानसिक व सामाजिक आधार मिळाला आहे.

समाजातील एका कुटुंबावर आलेल्या संकटाच्या वेळी समाजाने एकत्र येत दिलेली ही मदत केवळ वस्तूंची मदत नसून, माणुसकी, सामाजिक बांधिलकी आणि एकोप्याचे जिवंत उदाहरण ठरली आहे. युवक जोडो अभियानाच्या या कार्यामुळे गोपाळ समाजातील ऐक्य व संवेदनशीलता अधोरेखित झाली असून, अशा उपक्रमांमुळे गरजू कुटुंबांना नवी आशा मिळत आहे.

या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, समाजातील युवकांनी घेतलेला हा पुढाकार इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. समाजातील गरजू आणि संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी युवक जोडो अभियान सातत्याने कार्यरत असून, सामाजिक बांधिलकीची परंपरा अधिक बळकट करत आहे.

गोपाळ समाजातील गरजू व संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेले मच्छिंद्र गव्हाणे हे युवक जोडो अभियानाचे प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे अनेक गरजू कुटुंबांना वेळेवर मदतीचा हात मिळत असून, समाजात आशेचा किरण निर्माण होत आहे. राजू कालापाड यांच्या कुटुंबाला दिलेली मदत ही त्यांच्या सामाजिक बांधिलकीची व माणुसकीची जिवंत साक्ष आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आधार देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे ते गोपाळ समाजासाठी प्रेरणादायी व विश्वासार्ह नेतृत्व म्हणून ओळखले जात आहेत.

## जवाहरलाल नेहरू विद्यालयात' मराठी राज्यभाषा दिन' उत्साहात साजरा ; सुलेखनकार मनोहर जामकर यांच्या प्रदर्शनाने वेधले लक्ष

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात २६आणि २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी राजभाषा दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात अगदी शाही थाटात झाली मनोहर टेमकर सर आणि विजय पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या विद्यालयाच्या लेझीम पथकाच्या सादरीकरणाने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. सुप्रसिद्ध सुलेखनकार मनोहर जामकर सर यांच्या शुभहस्ते लाल फीत कापून सुलेखन प्रदर्शनाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या स्वागताचा फलक किशोर म्हात्रे सरांनी अत्यंत सुंदर आणि मोहक अक्षरात रेखाटला होता जो सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. त्यानंतर ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात झाली.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध सुलेखनकार मनोहर जामकर यांचे सुलेखन (कॅलिग्राफी) प्रदर्शन ठरले. जामकर सरांनी विद्यार्थ्यांना अक्षरांचे सौंदर्य प्रत्यक्ष कृतीतून दाखवले ज्यामध्ये विद्यार्थी पूर्णपणे रमून गेले होते. याप्रसंगी शालेय प्रशासकीय अधिकारी मोनिका रतनपर्ज मॅडम पालक संघाचे उपाध्यक्ष रमाकांत म्हात्रे, अविनाश म्हात्रे सहसचिव योगेश तांडेल आणि पत्रकार तृप्ती भोईर उपस्थित होत्या .विद्यालयाचे मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील सर ,इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, अंकुश जोगळे सर आणि बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे मॅडम, पर्यवेक्षक जगदीश मढवी सर ,चंदा टेमकर मॅडम व सहकारी शिक्षकांच्या अचूक नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत देखणा आणि यशस्वी ठरला.

नववी इयत्तेतील स्वराने गोड आवाजात ईशस्तवन सादर केले. तर सातवीच्या विद्यार्थ्यांनी सतीश गावंड सरांच्या मार्गदर्शनाखाली 'माऊली' या मराठमोळ्या गीतावर उत्कृष्ट नृत्य सादर केले . सुलेखनकार मनोहर जामकर सरांनी सुलेखनावर आधारित चित्रफीत दाखवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यासाठी मयूर सरांनी तांत्रिक मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाच्या शिक्षिका सरोज भामरे यांनी केले. तर राजेंद्र ठाकूर सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंग्रजी व मराठी माध्यमांचे मुख्याध्यापक समस्त शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विशेष सहभागी वसंत कडू, शिवाजी गुरव ,शितल दर्णे आणि दिलीप घरत या सर्वांच्या सुंदर समन्वयातून 'मराठी राजभाषा' दिन सोहळा सुवर्ण अक्षराने कोरला गेला. प्रत्येकाने दिलेल्या योगदानामुळेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली,आणि कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत झाली .

## जिल्ह्यामध्ये दि.14 मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.14 मार्च 2026 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे.या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलवित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.लोकअदालतीचे फायदे पक्षकारांना कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरूध्द अपील नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानूसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते व निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. लोक अदालतीमध्ये प्रकरण निकाली निघाल्यास वेळ, पैसा व श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होते.

यापूर्वी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि.13 डिसेंबर 2025 रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंवित 5 हजार 169 आणि वादपूर्व 12 हजार 751 असे एकूण 17 हजार 920 एवढी प्रकरणे निकाली निघाली आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## संत तुकाराम पालखी महामार्ग : अपूर्ण कामामुळे सणसरमध्ये नागरिकांच्या जीवाला धोका

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : संत तुकाराम पालखी महामार्गाचे काम अपूर्ण राहिल्याने सणसर परिसरातील नागरिक आणि व्यापारी सततच्या होत असलेल्या अपघातांच्या छायेत जगत आहेत.रस्त्यावरील खड्डे,अपूर्ण डांबरीकरण आणि वाहतुकीसाठी आवश्यक असलेली सुरक्षितता उपाययोजना न झाल्याने दररोज जीवघेणे प्रसंग घडत आहेत.

स्थानिक व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की,महामार्गाच्या कामामुळे ग्राहकांची ये-जा कमी झाली असून व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. नागरिक मात्र प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संताप व्यक्त करत आहेत.“किती बळी गेल्यावर प्रशासन जागे होणार?” असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला आहे. गेल्या काही महिन्यांत या मार्गावर झालेल्या अपघातांत अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. तरीही संबंधित विभागाकडून ठोस पावले उचलली जात नाहीत. अपूर्ण कामामुळे वाहतुकीचा वेग कमी झाला असून,रात्रौ प्रकाशयोजनेचा अभाव हा आणखी एक गंभीर मुद्दा ठरत आहे. स्थानिक नागरिक व विविध संघटना यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की,नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारी ही ढिलाई तातडीने थांबवावी.अन्यथा संत तुकाराम पालखी महामार्ग नागरिकांच्या आक्रोशाचे प्रतीक ठरेल.

# नंददीप फाउंडेशन साठी निस्वार्थ मदत करणारे डॉ विजय मुन यांचा यवतमाळकर तर्फे नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे/महागाव ( यवतमाळ)** : यवतमाळ मनोरुग्णांसाठी देवदूत ठरलेल्या शिंदे दांपत्याचा यवतमाळकरांकडून नागरी सत्कार नंददीप फाउंडेशनच्या माध्यमातून रात्रंदिवस मनोरुग्णांची सेवा करणारे हाँगकाँग येथील द वन इंटरनॅशनल ह्युम्याटेरियन अवॉर्ड विजेते संदीप बाबाराव शिंदे ,नंदिनी संदीप शिंदे या दाम्पत्याच्या सर्व यवतमाळकर आणि नागरी सत्कार आयोजन समितीच्या वतिने सोमवारी रंगोली ग्राउंड वर नागरी सत्कार करण्यात आला नंददीपचे कार्य अविरत सुरू राहावे यासाठी यवतमाळकर शिंदे दाम्पत्याच्या कायम पाठीशी राहिल अशि ग्वाही मान्यवरानी दिली कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर विजय कावलकर वक्ते संतोष आरसोड प्रमुख अतिथी विजय इंगोले




,प्राध्यापक विवेक देशमुख, प्रशांत बनगिनवार ,जीवन लाभसेटवार, प्रवीण कापरतीवार, प्रदीप ओमनवार ,राजेश गडेकर राजीव उपस्थित होते. – नंददीप फाउंडेशनने त्यांच्या समाजसेवेतील असीम योगदानाबद्दल डॉ. विजय मुन यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. डॉ. विजय मुन यांनी समाजातील गरजू आणि बेघर लोकांसाठी घेतलेल्या उपक्रमांमुळे त्यांनी खूप लोकांचे जीवन उजळले आहे.

नंददीप फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केलेल्या एका विशेष कार्यक्रमात डॉ. विजय मुन यांचे योगदान साजरे करण्यात आले. या कार्यक्रमात यवतमाळ कर तर्फे नागरी सत्कार करण्यात आला सदस्यांनी डॉ. मुन यांना शाल, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविला.

फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी सांगितले की, "डॉ. विजय मुन यांचं कार्य आपल्या समाजासाठी एक प्रेरणा आहे. त्यांच्या योगदानामुळे अनेकांना जीवनात नवी उमेद मिळाली आहे आणि त्यांच्या उपचार पद्धतींमुळे अनेक लोकांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे."

डॉ. विजय मुन यांनी या सन्मानावर आपले आभार मानताना म्हटले, "हे सर्व माझ्या वाट्याला येणारे योगदान आहे. मी फक्त माझी जबाबदारी निभावत आहे. नंददीप फाउंडेशनच्या माध्यमातून ज्या मानवीय मूल्यांचा आम्ही प्रचार करीत आहोत, ते सर्वांच्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहे."

**आज नारायणला पाहून मन भरून आलं…**

तीन दिवसांपासून कोमात गेलेला हा बेघर प्रभूजी — ना बोलत होता, ना हसत होता, ना ओळखत होता कुणाला… पण आज त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुललं.कारण त्याला भेटले देवदूत डॉक्टर विजयकुमार मून सर आणि डॉ. पूजा विजय मून मॅडम (साईश्रद्धा हॉस्पिटल, यवतमाळ) — ज्यांनी पैशाची किंमत न पाहता, मानवतेची पूजा केली.नारायणसारख्या एका निराधार जीवासाठी दररोज पंधरा हजार रुपयांचा उपचार मोफत चालू ठेवणं हे साध्या माणसाचं काम नाही… हे तर खऱ्या अर्थाने सेवा, श्रद्धा आणि माणुसकीचं मंदिर उभारण्यासारखं आहे.नंददीप फाऊंडेशनचा प्रत्येक सदस्य या मानवदेवतांना वंदन करतो असे उदगार नंददीप फाउंडेशन चे संचालक संदिप शिंदे यांनी केले.

## बापूंचे बोरगाव' हीच आमच्या गावाची खरी ओळख ; स्वातंत्र्यसेनानी सखाराम बापूंच्या स्मृतींना विद्यार्थ्यांनी दिला लेखणीतून उजाळा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद प्रतिनिधी/ अशोक_म्हस्के :** "मराठवाडा मुक्तीसाठी संघर्ष केलेल्या कै. सखाराम बापू फदाट यांच्यासारख्या अनेक महान स्वातंत्र्यसेनानी मुळेच आज आपण मुक्त श्वास घेत आहोत. 'बापूंचे बोरगाव' हीच आमच्या गावाची खरी ओळख आहे, आणि हाच आमचा सर्वात मोठा स्वाभिमान आहे," अशा भावना जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव (बु.) येथील विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधांतून व्यक्त केल्या.

स्वातंत्र्य सेनानी सखाराम बापू फदाट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बापूंच्या शौर्यगाथांना शब्दबद्ध



केले. यावेळी बापूंच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थित विद्यार्थी आणि ग्रामस्थ भावूक झाले होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली होती. तज्ञ शिक्षकांनी निबंध तपासून विजेते घोषीत केले.यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

सखाराम बापू फदाट यांचे कार्य केवळ बोरगावपुरते मर्यादित नव्हते. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. नव्या पिढीपर्यंत हा प्रेरणादायी इतिहास पोहोचावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या धैर्यामुळेच या भागात क्रांतीची मशाल पेटत राहिली, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

**निबंध स्पर्धेत निवड झालेले विद्यार्थी**

१.लहान गट (वर्ग ३ री ते ५ वी):
प्रथम: पूर्वी अनिल फदाट
द्वितीय: प्रतीक्षा कैलास खंदाडे
तृतीय: प्रज्ञा गौतम वाहुळे
२. मोठा गट (वर्ग ६ वी ते ८ वी):
प्रथम: दिव्या सुभाष खंदाडे
द्वितीय: राजकन्या अजबराव जाधव
तृतीय: भाविका महादू फदाट

# ट्रकच्या पाठीमागच्या चाकाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड/गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : रस्ता मार्गांवरील अतिक्रमणामुळे बेशिस्त वाहतूक करने एका तरुण दुचाकीस्वाराच्या जीवावर बेतला आहे. 24 फेब्रुवारीच्या रात्री 8 वाजताचे सुमारास साखरीटोला येथील कवडी चौकात झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकी चालकाचा ट्रकच्या पाठीमागच्या चाकाखाली आल्याने जागीच मृत्यू झाला. मृतकाचे नाव रुपेश पुरुषोत्तम कुरसुंगे वय अंदाजे 22 वर्ष रा. सोनारटोला (गिरोला) ता. सालेकसा असे आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सतत अपघात होत असल्याने रस्त्याला लागून व्यवसाय करणाऱ्याचे विरोधात रोष व्यक्त केले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत युवक कवडी चौकात आपल्या उभ्या असलेल्या



दुचाकी क्रमांक एमएच 35 बी ए7655 वर बसून आपल्या मित्राची वाट बघत होता. त्याच वेळी मागेहून येणारा ट्रक क्रमांक: एमपी 33 एच 5494 या ट्रकच्या टाल्याचा हुक दुचाकीला लटकल्यामुळे दुचाकीस्वार थेट ट्रकच्या मागच्या चाकाखाली फेकला गेला. सदर चौकात मुख्य रस्त्याला लागून अनेक व्यवसायिकांचे अतिक्रमण असल्याने वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावे लागत असते, ट्रकचे चाक अंगावरून गेल्याने युवकाचा गंभीर दुखापत होऊन जागीच मृत्यू झाला. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली, मात्र युवक पूर्णपणे चिरडला गेल्याने त्याचा जीव वाचवता आला नाही. आमगाव सालेकसा मार्गांवरून भारी वाहन चालण्यास बंदी असल्यामुळे महाराष्ट्र सह मध्यप्रदेश व छतीसगड राज्यातील भारी या मार्गांवरून चालतात दरम्यान अपघातामुळे मुख्य रस्त्यावर काही काळ मोठी वाहतूक कोंडी झाली होती. घटनेची माहिती मिळताच सालेकसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. पोलिसांनी ट्रक चालकास ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून पुढील तपास सुरू आहे.

# सेवा, संवेदना आणि सृजन: ‘SEA-तारा’ प्रदर्शनात झळकली एका अधिकाऱ्याची कलात्मक दृष्टी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : सीआरपीएफचे कमांडंट श्री जी.डी. पंढरीनाथ यांनी आयोजित केलेल्या चित्रकला आणि शायरी प्रदर्शन ‘SEA- तारा’ चे उद्घाटन 21 फेब्रुवारी रोजी, वर्धा रोडवरील लोकमत भवन येथील जवाहरलाल दर्डा आर्ट गॅलरी येथे करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे म्हणून संदीप पाटील, भा.पु.से. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान), नागपूर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची अध्यक्षता व मार्गदर्शन जी. डी. पंढरीनाथ, कमांडंट, सीआरपीएफ यांनी केले.कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे म्हणून संजय अग्रवाल, आयआरएस, अतिरिक्त आयुक्त, आयकर विभाग, नागपूर; डॉ. प्रविण डबली (एम.डी.-पर्यायी वैद्यक), नागपूर सदानंद उइके, विभागीय आयुक्त, नागपूर तसेच प्रणय सहाय, माजी महासंचालक, सीआरपीएफ हे विशेष उपस्थित होते या प्रदर्शनात डॉ.एम. के. सिन्हा, उप महानिरीक्षक (वैद्यकीय), संयुक्त रुग्णालय, सीआरपीएफ नागपूर तसेच हिंगणा, नागपूर परिसरातील सीआरपीएफ कार्यालयांतील अधिकारी, अधीनस्थ अधिकारी आणि जवान आपल्या कुटुंबीय व मुलांसह उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीतून कर्तव्यनिष्ठ सेवेसोबतच सांस्कृतिक व सृजनशील उपक्रमही जीवनाचा अविभाज्य भाग आहेत, हा संदेश देण्यात आला. हे उपक्रम संघटनात्मक एकता व मनोबल अधिक दृढ करतात. विशेष उल्लेखनीय म्हणजे, बलातील आपल्या सक्रिय व जबाबदार सेवे सोबतच जी.डी. पंढरीनाथ यांनी वेळेचे योग्य नियोजन आणि कर्तव्यपरायणतेत संतुलन राखत आपल्या भावना व अनुभवांचे चित्रांद्वारे प्रभावी चित्रण केले आहे. एक अधिकारी म्हणून व्यस्त दिनचर्येतूनही त्यांनी कलेप्रती असलेली निष्ठा जपली, जी उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरली. प्रदर्शनातील पुलवामा हल्ल्यावर आधारित चित्र विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. हे चित्र अत्यंत भावनिक व हृदयस्पर्शी होते, ज्यामुळे उपस्थित कला- रसिक भावुक झाले. अनेकांनी या कलेला प्रदर्शनातील सर्वाधिक प्रभावी व संस्मरणीय कलाकृती म्हणून गौरविले. 'SEA- तारा’ प्रदर्शनात चित्रकला आणि शायरीचा सुंदर व भावपूर्ण संगम पाहायला मिळाला. रंगांची अभिव्यक्ती आणि शब्दांची संवेदना यांचा मिलाफ प्रेक्षकांना एका वेगळ्या सृजनशील प्रवासावर घेऊन गेला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश कला, कल्पना शक्ती आणि सृजनशील अभि व्यक्तीला सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता, जेणेकरून समाजात संवेदनशीलता आणि सर्जनशील तेला प्रोत्साहन प्राप्त झाले आणि प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# सचिन करनेवार यांची घाटंजी प्रहार शहरप्रमुखपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी /महेश पेन्दोर** : प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा आदरणीय बच्चूभाऊ कडू यांच्या आदेशानुसार, सचिन करनेवार यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या घाटंजी शहरप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.





पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जवंजाळ आणि बिपीनभाऊ चौधरी सर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सचिन करनेवार यांच्या कार्यावर विश्वास ठेवून पक्षाने ही मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर सोपवली आहे.

या निवडीबद्दल बोलताना सचिन करनेवार म्हणाले की, "पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी सर्व पदाधिकाऱ्यांचा आभारी आहे. आगामी काळात सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन."या निवडीबद्दल प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि मित्रपरिवाराने सचिन करनेवार यांचे अभिनंदन केले आहे.

# सिल्लोडचा ऐतिहासिक ठेवा ; अभिजात मराठीचा 'बाणेश्वर' ठेवा ; ८०० वर्षांपूर्वीच्या शिलालेखातून उलगडला इतिहास !

सिल्लोडचा 'सेलवडे' म्हणून 'लीळाचरित्रा'त उल्लेख; यादवकालीन 'प्रौढ प्रताप' वैभवाचा जिवंत वारसा आजही सुरक्षित. :- मराठी भाषेला केंद्र सरकारने नुकताच 'अभिजात भाषे'चा दर्जा बहाल केला आहे. या सुवर्णक्षणी मराठीच्या प्राचीनतेचे पुरावे शोधले जात असताना, सिल्लोड येथील प्राचीन बाणेश्वर महादेव मंदिराचा शिलालेख हा महाराष्ट्राच्या आणि मराठी भाषेच्या सुवर्णयुगाचा सर्वात भक्कम आणि कायदेशीर पुरावा ठरला आहे. इसवी सन १२३० (शके ११५२) मध्ये कोरलेला हा शिलालेख आजही मराठी भाषेची प्रगल्भता आणि 'प्रौढ प्रताप' परंपरेची साक्ष देत दिमाखात उभा आहे.

शके ११५२ आणि सिंघणदेव यादवांचा सुवर्णकाळ

सिल्लोड शहराच्या वायव्येस वसलेले बाणेश्वर मंदिर हे यादव नरेश सिंघणदेव द्वितीय यांच्या कारकिर्दीतील एक अद्वितीय स्थापत्य आहे . मंदिराच्या गर्भगृहाजवळील भिंतीवर कोरलेला हा शिलालेख १५ ओळींचा असून, त्याची लिपी देवनागरी आणि भाषा तत्कालीन प्राकृत-मराठी आहे. हा शिलालेख स्पष्ट करतो की, यादव राजांच्या प्रशासनातील महाकर्णिक एल्लन पंडित (दामोदर पंडित यांचे सुपुत्र) यांनी आपली पत्नी बामदेवी हिच्या समवेत, पुण्यप्राप्तीसाठी हे शिवालय आणि एक 'वापी' (भव्य बारव) बांधली होती. ८०० वर्षांपूर्वीच्या या कोरीव कामात स्पष्ट मराठी शब्दांचा वापर त्या काळातील प्रगत भाषेचे दर्शन घडवतो.

॥ ऐतिहासिक दुवा ॥

'प्रौढ प्रताप' शब्दाचा उगम सिल्लोडच्या मातीत!

या शिलालेखाचे सर्वात मोठे ऐतिहासिक महत्त्व म्हणजे यात राजा सिंघणदेव यादवांचा उल्लेख 'प्रौढ प्रताप चक्रवर्ती' असा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हीच सन्मानसूचक बिरुदावली पुढे पाच शतकांनंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी आणि त्यांच्या गौरवार्थ वापरली गेली. मराठी अस्मितेचा हा 'प्रौढ प्रताप' शब्द ८०० वर्षांपूर्वी सिल्लोडच्या मातीत शिलालेखाच्या रूपाने कोरला गेला होता, हे ऐतिहासिक सत्य या निमित्ताने प्रकाशात आले आहे.

**'लीळाचरित्रा'तील 'सेलवडे'चे संदर्भांकित पुरावे**

मराठी भाषेतील आद्य गद्य ग्रंथ मानल्या जाणाऱ्या 'लीळाचरित्र' (उत्तरार्ध) मधील लीळा क्रमांक ४२७ मध्ये या परिसराचे सविस्तर वर्णन येते. महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी आपल्या परिभ्रमणादरम्यान या बाणेश्वर मंदिरात आणि बारवेवर वास्तव्य केले होते. ग्रंथात सिल्लोडचा उल्लेख तत्कालीन 'सेलवडे' असा करण्यात आला आहे. हे साहित्यिक आणि पुरातत्वीय पुरावे एकमेकांशी तंतोतंत जुळत असल्याने या इतिहासाला कायदेशीर आणि संशोधकीय बळकटी मिळते.

**वारसा जतन: काळाची गरज**

सिल्लोड तालुक्यात एकेकाळी अशा दोन महत्त्वाच्या शिलालेखांची नोंद होती, मात्र हट्टी येथील शिलालेख काळाच्या ओघात लुप्त झाला. सुदैवाने, बाणेश्वरचा हा अनमोल ठेवा अभ्यासकांच्या प्रयत्नांमुळे आजही सुरक्षित आहे. हा वारसा केवळ एका तालुक्याचा नसून संपूर्ण मराठी संस्कृतीचा पाया आहे.

"बाणेश्वरचा शिलालेख हा अभिजात मराठीचा जिवंत दस्तऐवज आहे. 'प्रौढ प्रताप' सारखे शब्द आणि लीळाचरित्रातील उल्लेख हे सिद्ध करतात की, सिल्लोड हे यादव काळात मराठी संस्कृती आणि प्रशासनाचे मुख्य केंद्र होते. हा वारसा जतन करणे हीच भाषेची खरी सेवा आहे."

**— डॉ. संतोष पाटील**
**(इतिहास अभ्यासक तथा उपाध्यक्ष, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड)**



# नगर पंचायत राळेगावचे विषय समित्यांचे आणि सभापती पदाची बिनविरोध निवड



**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/जितेंद्र खोडे** : दि.२६ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या नगर पंचायत राळेगांवच्या विषय समित्यांचे सभापती अविरोध निवडल्या गेले आहे. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती पदासाठी उपाध्यक्ष जानराव वामनराव गिरी,सार्वजनिक बांधकाम समिती सभापती सौ.ज्योत्स्ना भानुदास राऊत,स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य सभापती सौ.कमरुन्निस्सा हमीदभाई पठाण, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.सिमरन इमरान पठाण,महिला व बालकल्याण उपसभापतीपदी सौ.मोहिनी प्रतिक बोबडे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.सदर निवडणूक प्रक्रीये वेळी श्री.रविंद्र शेषराव शेराम,अध्यक्ष न.प.राळेगाव व श्री.जानराव वा.गिरी उपाध्यक्ष आणि नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. तसेच सर्व निवड झालेले नविन सभापती व उपसभापती तसेच सर्व समिती सभासद यांचे मा.गिरीष पारेकर पिठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी गट अ न.प.राळेगाव यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी कुंदन कांबळे,कमलेश गहलोत,दिलीप दुधगिरकर,सौ. अश्विनी लोहकरे,सौ.ज्योत्स्ना डंभारे, सौ.पुष्पा किन्नाके,संतोष कोकुलवार, सौ.कविता कुडमेथे,श्रीमती नलू शिवणकर सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणच्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या कामगिरीचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**नागपूर** : सर्वाधिक अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून देशात प्रथम क्रमांक पटकावण्याच्या महाराष्ट्राच्या कामगिरीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या महावितरणचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने मुंबई येथे बुधवारी (25 फेब्रुवारी) गौरव करण्यात आला. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमात 92.7 बिग एफएम या लोकप्रिय रेडिओ चॅनलच्या वतीने विविध क्षेत्रात कल्पकता व नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला.




मुंबई महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. आशिष शेलार, जेष्ठ अभिनेते बोम्मण ईराणी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. पुरस्कार वितरणाच्या नेत्रदिपक कार्यक्रमाला तर सिनेसृष्टी, सामाजिक, राजकीय, उद्योग, कला क्षेत्रातील नामवंत उपस्थित होत्या.

ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे 88.50 लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. राज्याच्या या यशात महावितरणची कामगिरी प्रमुख आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट 80 पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. तसेच औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी 9 ते सायंकाळी 5 या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे.

राज्यात 9 फेब्रुवारी ते 23 फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात आला. यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्मार्ट मीटरच्या लाभांबाबत राज्यभरात जनजागृती करण्यात आली. फोटोओळ- स्मार्ट मीटर बसवण्यात देशात अव्वल स्थान पटकावण्याच्या कामगिरीबद्दल महावतिरणला मिळालेला 'बिग इम्पॅक्ट' पुरस्कार मुंबई मनपाच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते स्वीकारताना कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार

# श्रिनिवास इलतेपवार यांनी नांदेड जिल्हयाचे जिल्हाधिकारी व पोलिस महानिरिक्षक यांना दिले निवेदन

## सुसाट वेगाने व ओव्हर लोड जाणाऱ्या रेतीच्या वाहनावर अंकूश कोण लावणार

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे** : देगलूर(दि.२७) मागील काही दिवसांपासून मौजे सगरोळी तालुका बिलोली येथून रेतीचे वाहने सुसाट वेगाने धावत असून या गाड्यांना नंबर प्लेट नाहीत,वाहनांना पासिंग किती टनाची आहे आणि वाहतूक करण्यासाठी वाहनांना ओव्हरलोड कोणत्या माध्यमातून,देगलूर येथील तहसिल कार्यालय, उप जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून सुसाट वेगाने धावत असलेल्या रेतीच्या वाहनांवर अंकूश कोण लावणार?अशा अनेक समस्या निर्माण होतात.अशा समस्यांचा विचार करून शहापूर येथील सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास इलपतवार यांनी नांदेड येथील जिल्हाधिकारी व पोलिस महानिरिक्षक यांना निवेदन देऊन अशा प्रकारावर तात्काळ कारवाई करण्यात यावे अन्यथा उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

या निवेदनात म्हटले आहे की,मागील काही दिवसांपासून रात्रंदिवस सुसाट वेगाने धवणारे किमान शंभर गाड्यांचा ताफा घेऊन जातात आणि या वाहन धारकांजवळ रॉयल्टी भरलेली पावती नाही,तर काही वाहने एकाच रॉयल्टीवर तीन ते चार चकरा मारतात परंतू यावर कुणाचाच अंकूश नाही.

दि.१७ फेब्रूवारी २०२६ रोजी सुद्धा निवेदन देण्यात आले असून त्या निवेदनाची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आज दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व नांदेड जिल्ह्याचे पोलिस महानिरिक्षक यांना निवेदन देण्यात आली आहे.या निवेदनाची दखल घेऊन त्या वाहनावर कारवाई करण्यात यावी असेही यावेळी श्रिनिवास इलतेपवार यांनी सांगितले.

# तिरळे कुणबी सेवा मंडळ नागपूर च्यावतीने शिवजयंती 2026 उत्सव १ मार्चला साजरा करणार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव/वाडी नागपूर** : तिरळे कुणबी सेवा मंडळातर्फे शिवजयंती उत्सव सत्कार सोहळा रविवार दिनांक १ मार्च रोजी, सकाळी १० वाजता. तिरळे कुणबी सेवा मंडळ, टाऊन हॉल आशीर्वाद नगर नागपूर येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमा प्रसंगी डॉ. अमरावतीचे श्री. नरेशचंद्रजी काठोळे यांचे मिशन आय ए एस, वरील प्रबोधन व मार्गदर्शन तसेच सोबतच शिवछत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन: "आजच्या परिस्थितीत कोणत्या पद्धतीने अंगीकारावा" यावरील विलासजी इंगोले ह्यांचे व्याख्यान आयोजित केले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार सुधाकर कोहळे तसेच प्रमुख पाहुणे व मार्गदर्शन माजी आमदार सुधाकरराव देशमुख यांची उपस्थिती राहतील. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सौ.नीताताई राजेंद्र ठाकरे ह्या पहिल्यांदाच महापौर झाल्या त्याबद्दल त्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला आहे. यांच्यासहित इतरही मान्यवरांचा सत्कार करण्यात येईल. असे पांडुरंग वाकडे पाटील यांनी म्हटले आहे. कार्यक्रमाचे आयोजन तिरळे कुणबी सेवा मंडळाने केले असून यावेळी अध्यक्ष पांडुरंग वाकडे पाटील, महादेवराव बोराडे, सचिव नितीन हांडे आणि रमेश टाले परिश्रम घेत आहे. तिरळे कुणबी सेवा मंडळाच्या वतीने समाजातील मान्यवर व जेष्ठ नागरिक यांचा सत्कार आयोजित केला असून सर्व समाज बांधव व शिवप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे व सहकार्य करावे. असे आवाहन अध्यक्ष श्री. पांडुरंग वाकडे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# एम बी पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन आज

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव/वाडी नागपूर** : गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित मनोहर भाई पटेल महाविद्यालय सालेकसा येथे आदिवासी इतिहास, साहित्य, संस्कृती, राजकारण, आर्थिक परिस्थिती व पर्यटन या विषयावर दि.२७ फरवरी २०२६ ला शुक्रवार ला आंतरभाषीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन गोंदिया शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र जैन करणार असून, अध्यक्ष डॉ. सुनिता जैन, प्रमुख अतिथी प्रभाकर दोनोडे, प्राचार्य डॉ. बी के. जैन राहणार असून प्रमुख वक्ते रायपूरच्या डॉ.रिया जैन आहेत. प्रथम सत्रात अध्यक्ष संजय तवाडे असून प्रमुख वक्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्याम कोरेटी तर दुसऱ्या सत्रात प्राचार्य डॉ.एस. एन. मूर्ती अध्यक्ष असून गोंडी भाषा साहित्यिकां उषाकिरण आत्राम यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या परिषदेला यशस्वी करण्याचे आव्हान डॉ. वर्षा गगने , प्रा.भगवान साखरे, डॉ.आर यु. गायकवाड, डॉ.नामदेव हटवार, डॉ.परिमल डोंगरे, डॉ. अश्विन खांडेकर, ग्रंथपाल अरविंद भगत , प्रा. वाय आर जोगी, डॉ.बाबुसिंग राठोड ,डॉ.लक्ष्मण पेटकुले , प्रा. मनोहर वाघेरे यांनी केलेले आहे.

# सावरी ग्रामपंचायतीत अराजक! कर्मचाऱ्यांना हाकलून कार्यालयाला कुलूप; दोषींवर फौजदारी गुन्ह्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : दि. 23 फेब्रुवारी रोजी सावरी /मुरमाडी ग्रामपंचायत कमिटीतील काही पदाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना त्यांचे नियमित काम करण्यापासून रोखून त्यांना कार्यालयाबाहेर काढले आणि ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे त्यादिवशी ग्रामपंचायतीचे सर्व कामकाज ठप्प झाले असून ग्रामस्थांना विविध शासकीय सेवांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता .या गंभीर प्रकाराची दखल घेत सामाजिक कार्यकर्ता डॉ. दिपराज इलमकर यांनी दि. २६ फेब्रुवारी रोजी आपल्या शिष्टमंडळासोबत जावून पंचायत समिती मध्ये गट विकास अधिकारी (BDO) यांना निवेदन सादर केले आणि दोषी पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सार्वजनिक कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जबरदस्तीने बाहेर काढणे व कार्यालय बंद करणे हा कायद्याचा भंग असून, ही कृती ग्रामस्थांच्या हक्कांवर आघात करणारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनाची दखल घेत गट विकास अधिकाऱ्यांनी प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच दोषी आढळल्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि संबंधित फौजदारी कलमान्वये कारवाई होण्याची शक्यता आहे.

# माऊली जय माऊली जय मुगसाजी माऊली"जयघोषाने दुमदुमली तुपटाकळी नगरी

## पुण्यतिथी निमित्त काढण्यात आली महाराजांची मिरवणूक

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर** : श्री.परमहंस मुंगसाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त तुपटाकळी नगरीत भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री मुंगसाजी महाराज मंदीरात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात गावातील युवक, महिला व पुरुष मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

पुण्यतिथीनिमित्त काढण्यात आलेली श्री मुंगसाजी महाराजा ची मिरवणूक हे या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. पुण्यतिथी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सात दीवस आधीपासुन गावातील सर्व भजनी मंडळांनी भजनांचा कार्यक्रम मंदीरात मोठ्या उत्साहात केला व मोठ्या संख्येने भाविकांनी याचा लाभ घेतला पुण्यतिथी २४ फेब्रुवारी रोजी सकाळी महाराजांच्या चरित्राचे पारायण श्री गणेश कदम यांच्या



मधुर वाणीतुन करण्यात आले १२वाजता महाआरती करण्यात आली. नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

सायंकाळी सात वाजता मुंगसाजी महाराज मंदिरावरुन महाराजांची मिरवणुक रथावर काढण्यात यावेळी गावातील सर्व भजनी मंडळ यावेळी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते टाळ-मृदुंगाच्या निनादात, ढोल-ताशांच्या गजरात 'माऊली माऊली जय मुंगसाजी माऊली च्या जयघोषात' संपूर्ण गाव दुमदुमून गेले. महाराजाच्या रथाच्या मार्गावर भाविकांनी फुलांची उधळण करत रांगोळी काढून रस्त्याच्या कडेला दिपप्रज्वलन करून शोभा वाढवली माऊलींच्या चरणी भक्ती अर्पण केली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या श्रद्धेने आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभाग घेतला. गावातील विविध भागांतून पालखीचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण गावात आध्यात्मिक उर्जा आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत होते. युवकांनी स्वयंसेवक म्हणून जबाबदाऱ्या पार पाडत कार्यक्रम सुरळीत होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. महीला फुगडी खेळताना मुंगसाजी माऊलीचा नामाचा गजर करीत होत्या तुपटाकळी नगरीत साजरा होत असलेला भक्तीमय सोहळा गावातील व बाहेर गावाहून आलेल्या भाविकांच्या कायम स्मरणात राहील मिरवणूक परत मंदीरात आल्यानंतर आरतीचे कार्यक्रम पार पडला व कार्यक्रमाची सांगता झाली.

# भेल प्रकल्पाचा 'घातपात'? २४० कोटींचे अनुदान थांबल्याने उद्योग ठप्प; प्रकल्पग्रस्तांचा संताप

**दैनिक युवक आधार**



**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा** : जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा कणा ठरणारा आणि हजारो युवकांना रोजगाराची आशा देणारा भेल (BHEL) प्रकल्प आजही अपूर्ण अवस्थेत अडकून पडला असून, या प्रकल्पाच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सन २०१४ च्या निवडणुकीपूर्वी मोठ्या थाटामाटात उद्घाटन झालेल्या या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात अनुदान जाहीर करण्यात आले होते. राज्य सरकारने प्रारंभी अनुदानही दिले; मात्र निवडणुकीनंतर राजकीय घडामोडी बदलल्या आणि केंद्र सरकारकडून जाहीर झालेले २४० कोटी रुपयांचे अनुदान अचानक थांबविण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

भेल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली असता, ठराविक कालावधीत प्रकल्प पूर्ण न झाल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) जमीन लीज रद्द केली, अशी माहिती समोर आली आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून, याचा थेट फटका प्रकल्पग्रस्त, बेरोजगार युवक आणि जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला बसत आहे.

गेल्या दहा वर्षांपासून प्रकल्प सुरू व्हावा या मागणीसाठी प्रकल्पग्रस्त व भेल संघटनेने अनेक मोर्चे, आंदोलने आणि निवेदने दिली; मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. संघटनेचा आरोप आहे की, राजकीय सूडभावना आणि वर्चस्वाच्या राजकारणामुळे हा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ दिला गेला नाही, ज्यामुळे विकासाच्या नावाखाली जिल्ह्याची फसवणूक झाल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र झाली आहे.भेल संघटनेचे अध्यक्ष विजय नवखरे यांनी इशारा देताना सांगितले की, "संबंधित विभाग आणि मंत्रालयाने तातडीने निर्णायक भूमिका घेऊन प्रकल्प सुरू करण्याचा मार्ग मोकळा करावा. अन्यथा संघटनेच्या वतीने भेल प्रकल्पासमोर तीव्र आणि व्यापक आंदोलन छेडण्यात येईल."

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार 2025

## 15 मार्चपर्यंत प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार 2025 साठी प्रवेशिका मागविण्यात येत आहे. प्रवेशिका जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याची अंतिम मुदत 15 मार्च 2026 असून जास्तीत पत्रकारांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन आणि उत्कृष्ट दूरचित्रवाणी, वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार, समाज माध्यम पुरस्कार. स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. 2025 या कॅलेंडर वर्षाकरीता दि.01 जानेवारी ते 31 डिसेंबर 2025 पर्यतच्या कालावधीसाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख 15 मार्च, 2026 अशी राहील.उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार 2025 चे माहितीपत्रक/अर्जाचे नमुने यासोबत पाठविण्यात येत आहेत. तसेच सदर माहिती शासनाच्या www.maharashtra.gov.in, आणि महासंचालनालयाच्या dgipr.maharashtra.gov.in, या संकेतस्थळावर तसेच https://mahasamvad.in, या ब्लागवर उपलब्ध आहे.

## ड्रॉव्हरमधून 51 हजारांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हरमध्ये असलेले ५१ हजार रुपये चोरून नेल्याची घटना गांधी हॉस्पिटल मध्ये घडली आहे. आरोपी रोहित भोसले याने गांधी हॉस्पिटलच्या रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हर मध्ये असलेले 51 हजार रोख रक्कम रुपये हे रिसेप्शनीस्ट शीतल तुपसमुद्रे किंवा हॉस्पिटलच्या इतर स्टाफच्या संमतीशिवाय चोरुन नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 17 वर्षीय तरुणीची अपहरण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** सतरा वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात 25 फेब्रुवारी रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रसिका पवार ह्या कोंडप, वावंजे येथे राहत असून 24 फेब्रुवारी रोजी त्यांची 17 वर्षीय मुलगी घराच्या बाहेर मंडपामध्ये गेली होती. थोड्यावेळाने तिला जेवायला बोलावण्याकरता त्या गेल्या असता मंडपामध्ये त्या दिसून आले नाहीत. तिचा परिसरात शोध घेतला मात्र ती सापडली नाही. अनोळखी इसमाने तीला पळवून नेले. ती अंगाने मध्यम, रंग गहूर्णीय, उंची पाच फूट तीन इंच आहे आणि कपाळावर टिकली, गोंदन केलेली आहे. अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस आणि पायामध्ये उंच सॅंडल घातलेली आहे.

## स्कुटीला चार चाकी कारची धडक, ज्येष्ठ नागरिक जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** स्कुटीला चार चाकी कारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात 67 वर्षीय अतुल अनंता पाटणकर (राहणार टिळक रोड, जय भारत नाका पनवेल) हे जखमी झाले. अतुल पाटणकर हे टीव्हीएस कंपनीची स्कुटी क्रमांक एम एच बारा एलसी 0572 घेऊन 25 फेब्रुवारी रोजी मुळगाव चिखले येथे शंकर मंदिराचे बांधकाम सुरू असल्याने ते पाहण्यासाठी निघाले. ते सकाळी सव्वाचारच्या सुमारास नानासाहेब धर्माधिकारी ब्रिजवर पंचमुखी हनुमान मंदिर सिग्नलच्या अलीकडे ब्रिज उतरत असताना पाठीमागून आलेल्या ह्युंदाई कंपनीच्या आय टेन गाडीने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. या धडकेते ते खाली पडले. यावेळी त्यांच्या पायाची बोटे फ्रॅक्चर झाली आणि डोक्याला दुखापत झाली.

## 6 लाख 40 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल:** वेबसाईटच्या ऑफिस मधून बोलत असल्याचे भासवून एपीके फाईल डाऊन करण्यास सांगितली आणि स्क्रीन शेअर करून मोबाईल मधून सहा लाख 40 हजार रुपये परस्पर इतर ठिकाणी वळते करून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 23 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अरुण जाधव हे कळंबोली सेक्टर एक येथे राहत असून त्यांनी नागरमोली येथे अपॉइंटमेंट साठी कुंभार हॉस्पिटल सर्च केले. यावेळी त्यांना वेबसाईट मिळून आली आणि व्हाट्सअप नंबर मिळाला. त्यांनी कॉल केला असता समोरील इसमाने अपॉइंटमेंट द्यायचे असल्याबाबत सांगितले. यावेळी व्हाट्सअपला फाईल पाठवतो ती डाऊनलोड करण्यास सांगितली. ती एपीके फाईल त्यांनी डाऊनलोड केली. मात्र फाईल ओपन झाली नाही. समोरील इसमाने त्यांना व्हाट्सअप वरून स्क्रीन शेअर करायला सांगितले. आणि लिंक पाठवली. ती लिंक आली असता फॉर्म भरून पेमेंट ऑप्शनला गेले. यावेळी दहा रुपये पेमेंट करण्यास सांगितले. मात्र पेमेंट फेल झाले. त्यानंतर हॉस्पिटलला येण्यास सांगितले व तेथे पेमेंट करा असे सांगितले आणि कॉल कट केला. 19 फेब्रुवारी रोजी त्यांच्या गुगल पे वरून अचानक पैसे वजा होण्यास सुरुवात झाली आणि मेसेज येऊ लागले. एकूण सहा लाख 40 हजार रुपये त्यांच्या खात्यातून वजा झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येतात त्यांनी अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल केला.

## अपघात केल्याच्या कारणावरून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** अपघात केल्याच्या कारणावरून शिवीगाळ आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व एकाने डोक्यावर दगड मारून जखमी केल्याप्रकरणी तिघां विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 22 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गितेश पानमंद हे कळंबोली सेक्टर एक येथे राहत असून ते देवेंद्र सोबत रिक्षाने डबा घेण्यासाठी जात होते. यावेळी गावदेवी मंदिराजवळ आगरी समाज मंदिराशेजारी, सेक्टर 14, कामोठे येथे मोटरसायकलने रिक्षाला धडक दिली यात मोटरसायकल चालक खाली पडला. यावेळी चौकशी करत असताना दोन ते तीन इसम त्यांच्याजवळ आले आणि गितेश आणि देवेंद्रला शिवीगाळ केली व मारहाण केली. त्यातील एकाने डोक्यावर दगड मारला. आणि बाबू उर्फ रवींद्र पाल यांनी गीते यांच्या गालावर चावा घेतला आणि तिघेही तिथून पळून गेले.

## तुळजाभवानी वस्ती संताजी परिसरात हिंदू संमेलन मोठ्या उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : तुळजाभवानी वस्ती संताजी परिसरामध्ये भव्य हिंदू संमेलन रविवारी पार पडले. आदल्या दिवशी शनिवारी सामूहिक रामरक्षा स्तोत्र मारुती स्तोत्र याचे पठण शंभर स्त्री, पुरुष व छोटे मुलं मिळून केले व दुसऱ्या दिवशी सकाळी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यातील संगीत खुर्ची, लिंबू चमचा, रांगोळी स्पर्धा व पुरुषांकरिता वलया रिंग स्पर्धा घेण्यात आल्या व संध्याकाळी पाच ते नऊ गो पूजन, ध्वजपूजन, भारत माता पूजन, आठवण विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. त्यात कथक नृत्य योगा नृत्य मिले सुर मेरा तुम्हारा यावर नृत्य व मी जिजाऊ बोलते. हा एक पात्र प्रयोग सौ. राखी जामकर यांनी सादर केला व नंतर श्री संजय सराफ यांचे उद्बोधन झाले व त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाचे शेवट झाली. या कार्यक्रमाला स्त्री, पुरुष व मुले पकडून पाचशे लोकांची उपस्थिती होती.

# कोलमांडला (मुरुड)कांदळवन पुनर्स्थापना सुरु

## फ्लोटिंग जेटी अवैध; जेटी NOC कायमच - सागरी मंडळाचे दुर्लक्ष उघडे!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** कोल मांडला(ताराबंदर) येथे कांदळवन पुनर्लागवड सुरूझाली आहे तरीही अनधिकृत फ्लोटिंग जेटीचा NOC कायम - महाराष्ट्र सागरी मंडळाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह! राज्याच्या लेवलच्या काही सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बंद दाराआड काय पाकिटात गोडबंगाल लपलय ?रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील मौजे कोलमांडला (ताराबंदर) येथे गेल्या वर्षांपासून सुरू असलेल्या कांदळवन कत्तल, अनधिकृत भराव व अतिक्रमण प्रकरणात शासनाने आता पुनर्लागवड सुरू केली असली तरी महाराष्ट्र सागरी मंडळाने (एमएमबी) दिलेला फ्लोटिंग जेटीचा ना हरकत दाखला (एनओसी) अद्याप रद्द झालेला नाही, ही बाब ग्रामस्थांसह सामाजिक कार्यकर्त्यांना संशयास्पद वाटत आहे.



**"पुनर्लागवडीची सुरुवात"**

ताराबंदर खाडीत अनधिकृत भराव हटवून कांदळवन पुनर्संचयित करण्याचे काम फेब्रुवारी २०२६ मध्ये सुरू झाले आहे.स्वयंसेवी संस्थेमार्फत हे काम सुरू असून, शासकीय पाहणी अहवालानुसार पूर्वीचे कांदळवन क्षेत्र नष्ट झाल्याचे मान्य झाले आहे.ग्रामस्थांच्या दीर्घकाळाच्या पत्रव्यवहाराने हे साध्य झाले असले तरी पर्यावरणीय नुकसानाची जाणीव शासनाला झाली आहे.

**"एनओसी उल्लंघनाची तक्रारी"**

एमएमबीने दिलेल्या फ्लोटिंग जेटी परवानगित अटींचे (जसे विभागीय NOC, मासेमारी अडथळा, मोजमाप, पर्यावरण हानी) मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाले असून, स्थानिक मच्छिमार व ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी केल्या तरी कारवाई झालेली नाही.परवानगी गट ४९ व ५० पर्यंत मर्यादित असताना इतर ठिकाणी अतिक्रमण सुरू असल्याचे पुरावे उपलब्ध आहेत.

**"आरटीआय माहितीनुसार"**

प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांचे मोजमाप अहवालही उपलब्ध नाहीत. ग्रामस्थांची मागणी ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे सचिव प्रतिक प्रमोद कणगी यांनी एमएमबी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊन एनओसी तात्काळ रद्द, चौकशी व कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.दोन वर्षांपासून पाठपुरावा करणाऱ्या कणगी व ग्रामस्थांनी निर्णय न झाल्यास राष्ट्रीय हरित अधिकरण (एनजीटी) मध्ये न्यायिक पावले उचलण्याचा इशारा दिला आहे.

शासन जाणीवपूर्वक विलंब करून अनधिकृत व्यावसायिकांना संरक्षण देत असल्याचा आरोप होत आहे.

"शासनाचे दुर्लक्ष?"

कांदळवन पुनर्लागवड सुरू असताना जेटीचा एनओसी कायम ठेवण्यात एमएमबीचे दुर्लक्ष स्पष्ट दिसते, ज्यामुळे प्रशासकीय जबाबदारीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मुरुड तालुक्यातील संवेदनशील किनारपट्टीवर केवळ ११,८०० रुपयांच्या शुल्काने परवानगी देण्यात आली असून, वनखात्याची NOC नसतानाही कारवाई नाही.ग्रामस्थांच्या लढ्याने भराव हटले तरी पूर्ण न्याय मिळेपर्यंत प्रशासनाच्या कानावर जळू नये यासाठी धारदार कारवाई आवश्यक आहे.

# गुरुंचा वज्रनिश्चय – मोगल साम्राज्याला दिलेले 'अल्टिमेटम'

## टप्पा १: मानवतेसाठीचा त्याग (मूळ इतिहास)

**१. 'अहा!' शोध: बचावाकडून आक्रमणाकडे**

जेव्हा एखादं बलाढ्य साम्राज्य एखाद्या अल्पसंख्याक समुदायाला धमकावतं, तेव्हा तो समुदाय सहसा लपण्याचा प्रयत्न करतो. पण या अध्यायातला 'अहा!' क्षण म्हणजे गुरूची 'धोरणात्मक निर्भयता'. गुरूजींनी अटक होण्याची वाट पाहिली नाही, तर ते स्वतःहून दिल्लीच्या दिशेने निघाले. आपल्याला आज असा शोध लागेल की,"जर तुम्ही माझे धर्मांतर करू शकलात, तर बाकीचे तुमचे होतील," हा त्यांचा इशारा केवळ एक आव्हान नव्हतं, तर ती एक 'ढाल' होती जी त्यांनी कोट्यवधी लोकांवर धरली होती. स्वतःला 'एकमेव लक्ष्य' बनवून त्यांनी एका संपूर्ण संस्कृतीला अभयदान दिलं. संकटाच्या केंद्रस्थानी स्वतःला उभं करणं, हाच खऱ्या नेतृत्वाचा उच्चांक आहे.

**2. लयबद्ध कथा: निर्भयतेची ती पदयात्रा (पु.लं. शैलीत)**

पु.लं.च्या शैलीत सांगायचं तर,"काही माणसं संकटाकडे पाठ फिरवतात, तर काही माणसं संकटाच्या डोळ्यात डोळे घालून विचारतात-पुढं काय?"

आनंदपूरहून दिल्लीचा प्रवास डोळ्यासमोर आणा. गुरूजी घाईघाईने निघाले नाहीत, तर ते एखाद्या शांत संतासारखे, वाटेतल्या गावागावांत थांबत, लोकांशी संवाद साधत निघाले होते. ते झाडाखाली बसायचे आणि सामान्य माणसाला 'निर्भयते'चा पाठ शिकवायचे. जेव्हा ते मोगल अधिकाऱ्यांसमोर उभे राहिले, तेव्हा त्यांचा संदेश हिऱ्यासारखा स्पष्ट आणि धारदार होता. त्यांनी देवाधर्मावर वाद घातला नाही, त्यांनी 'स्वातंत्र्यावर' भाष्य केलं. त्यांनी बादशहाच्या प्रतिनिधींना ठणकावून सांगितलं की, श्रद्धा हा काही कपडा नाही जो जबरदस्तीने बदलता येईल. हा इतिहासला असा पहिला प्रसंग होता, जिथे एका व्यक्तीच्या 'आध्यात्मिक निश्चयाने' जागतिक साम्राज्याच्या 'राजकीय शक्ती'ला आव्हान दिलं होतं.

**3. 'आरसा' व्यायाम: तत्त्वासाठी ताठ कणा**

आज आरशासमोर उभे राहा आणि स्वतःला विचारा: जेव्हा तुमच्यावर तुमचे मूल्य बदलण्यासाठी दबाव येतो, किंवा कुणा मोठ्या माणसाला खुश करण्यासाठी तुम्हाला 'शॉर्टकट' घ्यावा लागतो, तेव्हा तुम्ही झुकता का? तुमच्याकडे स्वतःचा असा काही 'वज्रनिश्चय'(Ultimatum) आहे का? हा लेख आपल्याला विचारतो: तुमचं चारित्र्य काचेसारखं ठिसूळ आहे की पोलादासारखं कणखर? गुरूजी आपल्याला शिकवतात की, खरं सार्वभौमत्व हे पदात नसतं, तर ते आपल्या अंतरंगात असतं.

**4. R.E.A.C.H. तत्त्वज्ञानाची गुंफण**

Responsibility(उत्तरदायित्व): साम्राज्याच्या योजनेत त्यांनी स्वतःला 'सिंगल पॉईंट ऑफ रेझिस्टन्स' बनवलं आणि जनसामान्यांची संपूर्ण जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली.

Empathy(सहानुभूती): त्यांना माहित होतं की जर सामान्य माणसावर दबाव आला तर तो मोडेल. म्हणून त्यांनी तो सर्व दबाव स्वतःवर घेतला.

Awareness(जागरूकता): त्यांना जाणीव होती की अशा स्वरूपाच्या बलिदानाशिवाय राष्ट्राची झोपलेली सद्सद्विवेकबुद्धी जागी

# माझी मराठीची बोलू कौतुके...; परी अमृतातही पैजा जिंके...

मराठी ही आपली मातृभाषा आहे तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते जेष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**माझी मराठीची बोलू कौतुके**
**परी अमृतातही पैजा जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन**
**अशा शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे.**

**लाभले आम्हास भाग्य...**
**बोलतो मराठी...**

अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे.

एक हजार वर्ष जुनी, पाच हजार बोली भाषेपासून तयार झालेली, अमृतातही पैज जिंकणाऱ्या या माय मराठी भाषेच्या जपणुकीसाठी आपण काय करतो याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज हिंदी आणि इंग्रजी भाषांनी मराठी भाषेवर आक्रमण केले आहे. इंग्रजी व हिंदी भाषेच्या आक्रमणाने महाराष्ट्रातूनच मराठी भाषा हद्दपार होती की काय अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात याला सर्वस्वी मराठी माणसेच जबाबदार आहे. मराठी माणसांच्या मनातच मराठीला गौण स्थान आहे आणि इंग्रजी भाषेला प्रथम स्थान आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. इंग्रजीला ज्ञानभाषा म्हटले जाते म्हणून मराठीची उपेक्षा केली जात आहे. विशेषतः उच्चभ्रू मराठी कुटुंबात मराठीत बोलणे अप्रतिष्ठित समजले जाते तर इंग्रजी भाषेत बोलणे प्रतिष्ठेचे समजले जाते. मराठी ही मातृभाषा असूनही इंग्रजीतून बोलण्याचा अट्टहास धरला जातो. मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलायला कचरतात. मराठीपेक्षा इंग्रजी आणि हिंदीतून बोलणे प्रतिष्ठेचे समजतात. मराठी माणसेच आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्याऐवजी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत भरमसाठ फी भरुन दाखल करीत आहे. इंग्रजी भाषेचे अवास्तव स्तोम माजवल्याने मराठीमाध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी साहित्य संमेलनाकडे मराठी माणसेच पाठ फिरवू लागल्याने मराठी पुस्तकांच्या विक्रीत घट होऊ लागली आहे. ग्रंथालयातील मराठी पुस्तके वर्षानुवर्षे जागेवरूनही हलतही नाही. महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे. मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे.



श्याम ठाणेदार

# बोगस कामांवर सार्वजनिक बांधकाम विभागाची मेहर नजर

## शेळी रस्त्याच्या तक्रारी नंतर,गार्डनचे निकृष्ट काम ही चव्हाट्यावर

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी / जितेंद्र खोडे** :शासन निधी देते पण विकास कामे निकृष्ट होतात "दाल मे कुछ काला है " हे काही वर्षातच दिसायला लागते ,राळेगाव तालुक्यात मात्र निकृष्ट व बोगस काम मुळे या बाबत अख्खी दालच काली असल्याचा प्रत्यय सध्या चर्चेत आहे,राळेगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभाग या वेळी करतो काय असा प्रश्न जनतेच्या मनात येतो. राळेगाव तालुक्यात हा विषय डंक्यावर आला आहे,शेळी येथील तीन की.मी रस्त्याची दोन वर्षातच चाळण झाल्याच्या तक्रारी नंतर राळेगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे किस्से बाहेर यायला लागले आहे,तालुक्यातल्या अनेक गावात ठेकेदार व बांधकाम विभागाच्या मिलीभगत ने बोगस रस्ते झाल्याची सार्वत्रिक ओरड आहे,दस्तुरखुद्द



राळेगाव शहरालगतच्या गार्डन मधील निकृष्ट कामाची प्रत्यक्ष जिल्हाधिकारी यांनी दखल घेतली होती,प्रत्यक्ष भेट देऊन अभियंत्याची कानउघडणी केली मात्र अजूनही निकृष्ट काम नव्याने पूर्ण करण्यात आले नसल्याचा आरोप शिवसेना नेते प्रतीक बोबडे

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मेहरबानी ने निकृष्ट काम सर्वत्र दिसते शेळी येथेच नाही राळेगाव चे गार्डन त्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे. जिल्हाधिकारी यांनी याची प्रत्यक्ष पाहणी केली अधिकाऱ्यांची कानउघडणी केली, जिल्हाधिकाऱ्यापेक्षा हे मोठे आहे का ? निकृष्ट काम फक्त कंत्राटदार करत नाही तर त्या कामावर देखरेख ठेवण्याकरिता लाखो रुपये पगार देऊन शासनाने अभियंत्याची नेमणूक केलेली असते. सदर अभियंते टोलवाटोलवी करीत आहे याचा अर्थ त्याचा अप्रत्यक्ष सहभाग त्या कामाच्या गुणवत्तेच्या तडजोडी साठी केलेला आहे,यावर कारवाई होणे गरजेचे आहे.**

**प्रतीक बोबडे**
**शिवसेना (शिंदे गट )**

यांनी केला आहे,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बोगस कारभाराचे हे उदाहरण सध्या चांगलेच चर्चेत आहे. राळेगाव शहरातील नागरिकांकरिता निवांत,शांत,सोईस्कर व फेरफटका मारण्याकरिता एकमेव सुंदर जागा आहे ती तळ्या लगतचे गार्डन,या ठिकाणी लाखो रुपये सौंदर्यीकरणाच्या नावावर उधळण्यात आले,राळेगाव शहरातील नागरिकांना आम्ही यंव देऊ त्यांव देऊ म्हणत गार्डन चा चेहरा _मोहरा बदलवून टाकण्याच्या वल्गना झाल्या.निधी देखील आला,पण निकृष्ट कामाची वाळवी त्याला लागली आणि शहरातील लोकांना भीक नको पण कुत्रा आवर च्या धर्तीवर विकास नको पण निकृष्ट काम आवर म्हणण्याची वेळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सोईस्कर दुर्लक्षमुळे आली .१७ गंभीर त्रुटी यात असल्याची माहिती आहे . त्यातील काहींची पूर्तता करण्यात आली .मात्र पूर्तता जर करण्यात आली तर याचा दुसरा अर्थ काम निकृष्ट झाले हे आपोआप सिद्ध झाले असा घेतल्यास नागरिकांचे काय चुकले.राळेगाव हा कॅबिनेट मंत्र्यांचा मतदार संघ आहे,इथे करोडो रुपयांची विकासकामे झाली,शेकडो प्रस्तावित आहेत.मात्र जनतेच्या करातून होणाऱ्या या कामाचा दर्जा निकृष्ट असेल तर कशाला काहीच अर्थ राहत नाही.या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका यात प्रचंड संशयास्पद आहे.निकृष्ट कामावर कारवाई करण्याचे काम या विभागाचे आहे आणि इथेच पाणी मुरत असल्याचा दाट संशय जनतेला वाटतो .

# जगात कुठेही जा; परंतु मातृभाषेला विसरु नका

मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने "मराठी भाषा दिवस" म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला आगळे वेगळे महत्व असुन या दिवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणुनही साजरा केला जातो. मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समिक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म २७फेब्रुवारी १९१२रोजी पुणे येथे झाला.त्यांनी अनेक माध्यमांच्या सहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नाव लौकीक केले व गौरान्वीत केले.त्यामुळेच जगातील मराठी भाषीक २७ फेब्रुवारीला "जागतिक मराठी दिवस" म्हणुन साजरा करतात. मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे.मराठी भाषा सोज्वळ,निर्मळ आणि सोपी असल्याने कोणीही तीला सहज अवगत करू शकते.महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते.मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे.याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे.मराठी मांनसाचे कर्तव्य बनते की मराठी भाषा जगातील मानसाच्या ह्रदयात व रक्तात कसे रूजवीता येईल याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे. कारण ही मराठी भाषेची भुमी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,साधु-संत, थोर महात्मे, क्रांतीकारक, समाजसुधारक, जहालवादी, मवाळवादी यांच्या संकल्पनेतून व संस्कारातुनच मराठीचा उगम झालेला आहे.मराठी भाषेला जिवीत ठेवण्याचे काम वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजवीला.त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे २७ फेब्रुवारीला जागतिक मराठी भाषा दिवस म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषीक "मराठी भाषा गौरव दिवस" म्हणून साजरा करतात. आपल्या पुर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली.परंतु आताची नवीन पिढी मराठीचे मुळ शब्दच विसरल्याचे दिसून येते. आई-बाबा, काका-काकु,मामा-मामी, आजी-आजोबा,माऊशी या शब्दाचा विसरपडुन मम्मी-पप्पा, अन्टी, डॅडी,ग्रॅडफादर-ग्रडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करतांना दिसत आहे.यामुळे मराठी भाषेतील अम्रृतवाणी नष्ट होवू शकते.याला नाकारता येत नाही.भारतात २८ राज्य ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर १९५०० हुन अधिक मातृभाषा आहेत.त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत.त्या शिकाव्या व अवगत कराव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे. आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा जेवढा प्रचार करतात येईल तेवढा केलाच पाहिजे. मातृभाषा मराठी ही आईची भूमिका बजावीत असते तर राष्ट्रभाषा हिंदी ही वडीलांची भुमिका पार पाडते. भारतात १९५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत.परंतु या संपूर्ण भाषेमध्ये सोपी,सोज्वळ,मधुर आणि सहज अवगत होणारी एकमेव भाषा म्हणजे "मराठी भाषा"त्यामुळे आजच्या नविन पिढीला मी कळकळीची विनंती करतो की आपल्या मायबोली मराठीला न विसरता त्याची जोपासना केली पाहिजे. यातच महाराष्ट्राचा आणि मराठी भाषीकांचा गौरव आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे घोषित झाले. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो.मराठी भाषा महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण जगाला सुशोभित करणारी भाषा आहे.मी नवीन पिढीला आग्रह करेल की कमीत कमी मराठी वृत्तपत्रे नेहमीच्या वाचनात आणावी यामुळे मराठी भाषेचा मान उंचावेल. त्याचप्रमाणे मराठी भाषेला जीथे-जीथे रूजवीता येईल तीथे-तीथे रूजवुन मराठी भाषेला प्रज्वलीत करण्याचे काम आधुनिक युगात नवीन पिढीने केले पाहिजे.महाराष्ट्रातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती असो किंवा पंथाचा व्यक्ती असो तो मराठीचा सन्मानच करतो.परंतु मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीला जगभरात कशी सुर्यासारखी तेजस्वी करता येईल याकडे संपूर्ण मराठी भाषीकांनी लक्ष दिले पाहिजे व मराठी भाषेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्या गेले पाहिजे.याच मराठी भाषेने पो वाडा,कीर्तन,भजन,भारूड,ला वनीच्या माध्यमातून इंग्रजांना सळोकीपळो लावले व समाज जागृतीचे काम केले.आपण ज्या मातीत जन्म घेतला आणि ज्या भाषेच्या बळावर लहाण्याचे मोठे झालो.अशा मराठी भाषेचा प्रवास न थांबता संपूर्ण जगात झाला पाहिजे.तेव्हाच मराठी भाषेची मान आणखी उंचावेल व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते.ज्या मातीत आपण जन्म घेतला तेथील भाषेची पुजाअर्चना व्हायलाच पाहिजे कारण ती आपणासर्वांसाठी पुज्यनीय आहे. आज दक्षिण भारतातील मातृभाषेचा विचार केला तर ती इतरांसाठी बोलायला व वाचायला अवघड व कठीण वाटते. त्यामुळे या भाषांचा प्रसार जास्त होवु शकला नाही.परंतु आज मराठी भाषा जगभरात ऐकायला व पहायला मिळते ही आनंदाची व गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषेचा विचार केला तर भारतातील काणा-कोपऱ्यातील व्यक्ती सहज अवगत करीत असतो.त्यामुळे देशातील इतर राज्यांतील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात.यामुळेच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठी भाषा सोपी,सोज्वळ,निर्मळ आणि शांत स्वरूपाची आहे.या वैभवशाली महाराष्ट्रातील मराठी भाषा संपुर्ण जगात आकाशातील चांदण्यांसारखी चमकायला पाहिजे. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह करतो की माय मराठी,माझी मराठी, मी मराठी, मातृभाषा मराठी यापध्दतीने जोपासना व्हायलाच पाहिजे.कारण मराठी भाषा हा आपल्या पुर्वजांचा ठेवा आहे आणि ईश्वरी देण सुध्दा आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. कारण मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती, वारसा याला उंच शिखरावर नेण्याची जबाबदारी युवा पिढीवर आहे.कारण जगात अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलली जाते. महाराष्ट्रात जर आपण फिरायला निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरावर आपल्याला मराठी भाषेचा वेगवेगळा गोडवा दिसून येतो. कारण मराठीच्या प्रत्येक शब्दात मधुरता आणि सुसंगतपणा दिसून येतो.भारतासर संपूर्ण जगात सहज आणि सोपी भाषा असेल तर फक्त "मराठी भाषा". मराठी भाषा ही महाराष्ट्राचा राष्ट्रीय पक्षी मोराचा तुर्रा आहे तर जगाचा पीसारा आहे.त्यामुळे या गोडव्यामध्ये कुठेही खींडार पडणार नाही याची जबाबदारी भारतासह जगातील संपूर्ण मराठी भाषीकांनी घेतली पाहिजे. आज जगात मराठी भाषेचा वेगळा ठसा उमटवीण्याची वेळ आली आहे.कारण आज मराठी भाषा नदीच्या प्रवाहासारखी जलदगतीने जगात प्रवेश करीत आहे व तीला समुद्रासारखे अफाट करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे. त्यामुळे मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आपण शपथ घेवुया की मराठी भाषा जगभर पसरवीण्याकरीता आम्ही कटीबद्ध आहोत.मराठी भाषेला माझा मानाचा मुजरा. जगात बदलते हवामान व वाढते प्रदुषण आणि निसर्गाचा होत असलेला ह्मस यामुळे पृथ्वीचे संतुलन दिवसेंदिवस डगमगत आहे.यामुळे भूकंप, सुनामी, अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे समुद्राची पातळी वाढणे अशा अनेक भयावह घटना होत आहे. याला रोखण्यासाठी निसर्गाला वाचविणे गरजेचे आहे.

याकरीता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील.

यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल व यामध्ये आपल्याला मराठी भाषेचा वेगळाच आनंद, गोडवा व सुगंध अवश्य दिसून येईल व जगात मराठी भाषेची आगळीवेगळी प्रतीमा पहायला मिळेल आणि जगात एक चांगला संदेश जाईल. जागतीक मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्याम ठाणेदार

# मायबोलीत बोलू या! चला मराठीतच बोलू या!!

## मराठी भाषा गौरव दिन

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे.मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे…तुम्हाला माहिती आहे, श्री चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे.तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र. के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे— स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास**

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु, सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते—विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार

मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे

आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे

दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर

ही अत्यावश्यक पावले आहेत.दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे—

मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते

ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते

लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते

शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते

मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले

गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले

अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली

आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली

साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे

मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला… मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

**– प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर 9702858777**

# मराठी भाषा गौरव दिनी दादर ठरणार साहित्य-संस्कृतीचा साक्षीदार; सुवर्णमहोत्सवी दिवाळी अंक स्पर्धेचा मानाचा पुरस्कार सोहळा

शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता दादर-पश्चिम येथील धुरू हॉल, छबिलदास रोड येथे मराठी भाषा गौरव दिन आणि कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दादर सार्वजनिक वाचनालय, काशिनाथ धुरू हॉल ट्रस्ट, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा बहुआयामी सोहळा पार पडणार आहे. याच वेळी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभही होणार आहे. दिवंगत कामगारनेते वसंतराव होशिंग यांच्या स्मरणार्थ मराठी विचारधारा प्रतिष्ठानच्या वतीने "वैभवशाली मराठी भाषेचे गद्दार कोण?" या विषयावरील राज्यस्तरीय लेख स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभही पार पडणार आहे. भाषा, साहित्य, पत्रकारिता आणि विचारपरंपरेचा संगम घडवणारा हा सोहळा वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे.




मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आयोजित दिवाळी अंक स्पर्धेचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे होत असून, महाराष्ट्रात प्रतिष्ठा प्राप्त केलेल्या या स्पर्धेला सांस्कृतिक क्षेत्रात मानाचे स्थान लाभले आहे. गेली ५० वर्षे सातत्याने सुरू असलेल्या या अक्षरयज्ञाने दिवाळी अंक परंपरेला बळ दिले आहे. ११७ वर्षांच्या दिवाळी अंक परंपरेत सातत्य राखत गुणवत्तापूर्ण अंक प्रकाशित करणाऱ्या संपादकांना "सुवर्णमुद्रा दिवाळी अंक परंपरेची" हा विशेष सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. ग्रंथालय चळवळीत मोलाचे योगदान देणाऱ्यांसाठी दिवंगत दत्ता कामथे स्मृती "ग्रंथसखा सन्मान पुरस्कार" प्रदान केला जाणार आहे. यंदा मनमाड येथील शिक्षक अनिल शिनकर यांची निवड करण्यात आली आहे. शिनकर यांनी स्वखर्चाने १३५० प्रकाशनांचे ३५०० हून अधिक दिवाळी अंक संग्रही जतन केले असून त्यांच्या या अभ्यासपूर्ण जतनकार्याचा गौरव या मंचावर होणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. संजय घाडी (उपमहापौर, मुंबई), मा. श्री. अशोक पाटील (उद्योजक) आणि मा. श्री. संजय धुमाळ (पोलीस सहाय्यक आयुक्त) उपस्थित राहणार आहेत.

विशेष निमंत्रित पाहुणे म्हणून मा. श्री. अशोक कोठावळे (संपादक, दीपावली/ललित), मा. श्री. अरुण शेवते (संपादक, ऋतुरंग) आणि मा. श्रीमती नीलिमा कुलकर्णी (संपादक, धनंजय/चंद्रकांत) उपस्थित राहतील. रवींद्र मालुसरे (अध्यक्ष), श्रीमती शुभा द. कामथे (प्रमुख कार्यवाह), विकास होशिंग, ॲड. देवदत्त लाड, संजीव गुप्ते, प्रशांत घाडीगावकर (प्रमुख कार्यवाह), रमेश सांगळे (कार्याध्यक्ष), आत्माराम गायकवाड (कोषाध्यक्ष), नितीन कदम (कार्यवाह) व कार्यकारिणी सदस्य यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होईल.

मराठी भाषेचा स्वाभिमान, साहित्य परंपरेचे सातत्य आणि विचारस्वातंत्र्याची निष्ठा यांचा एकत्रित उत्सव म्हणून दादरचा हा मंच पुन्हा एकदा इतिहास साक्षी ठेवणार आहे. सुवर्णमहोत्सवी दिवाळी अंक परंपरेचा गौरव आणि भाषिक अस्मितेची अभिव्यक्ती एकाच व्यासपीठावर अनुभवण्याची ही दुर्मीळ संधी ठरणार असून, मराठी संस्कृतीच्या उज्ज्वल परंपरेला नव्या पिढीसमोर दृढपणे उभे करणारा हा सोहळा प्रेरणेचा नवा अध्याय लिहिणार आहे.